रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २६६
www.ramprahar.com

शनिवार, १५ एप्रिल २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

‘ठाकरेंचा सध्या दार खटखटाव भाई दार खटखटाव कार्यक्रम’/२

आजपासून खारघरमधील अंतर्गत रस्ते वाहतुकीत बदल/६

रायगडमध्ये गावागावात फडकले निळे झेंडे/७

## मुंबई-गोवा महामार्गावर दोन दिवस अवजड वाहनांना बंदी



**अलिबाग :** मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गावर १५ ते १६ एप्रिलच्या रात्री १२ वाजेपर्यंत खारघर ते सावंतवाडी, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-पुणे जुना महामार्ग तसेच इतर राज्यमार्गावर अवजड वाहनांना वाहतूक बंद करण्यात आली आहे. ज्येष्ठ निरुपणकार डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळा रविवारी (दि. १६) खारघर येथे आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याकरीता सुमारे १५ ते २० लाख श्रीसदस्य त्यांच्या खासगी वाहनाने, एसटी बसेसने खारघर येथे येणार आहेत. त्याचप्रमाणे १४ ते १६ एप्रिल अशी सलग तीन दिवस सुटी आहे. अशा वेळी अवजड वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे बंदी लागू करण्यात आली आहे.

# आली शासकीय योजनांची जत्रा

**मुंबई : प्रतिनिधी**

आता प्रत्येक जिल्ह्यातून किमान ७५ हजार लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देणारी शासकीय योजनांची एक अभिनव अशी जत्रा १५ एप्रिलपासून सुरू होणार आहे. १५ जूनपर्यंत चालणाऱ्या या जत्रेमध्ये संपूर्ण राज्यातून २७ लाख लाभार्थींना थेट लाभ देण्यात येणार असून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने उत्तम नियोजन करावे, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

‘जत्रा शासकीय योजनांची सर्व सामान्यांच्या विकासाची’ असे हे अभियान असून त्याचे समन्वयन मुख्यमंत्री सचिवालयाच्या जनकल्याण कक्षामार्फत करण्यात येणार आहे. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर व




- राज्यभर आजपासून दोन महिने सुरू राहणार अभियान
- २७ लाख नागरिकांना लाभ देण्याचा प्रयत्न -मुख्यमंत्री

तालुकास्तरावर जनकल्याण कक्षदेखील स्थापन करण्यात येणार आहे.

जनकल्याणच्या योजना घोषित करण्यात येतात, मात्र यासाठी नागरिकांना शासकीय कार्यालयाधून योजनांची माहिती घेणे, आवश्यक दस्तऐवज कार्यालयात जमा करणे, हे कागदपत्र पुन्हा सादर करण्यासाठी कार्यालयाकडे येणे अशा प्रक्रियेतून जावे लागते. **(पान २ वर..)**

### विविध विभाग एकाच छताखाली

या अभियानात नागरिकांना शासकीय योजनांशी निगडीत कार्यालयांचे प्रतिनिधी व विविध दस्तऐवज उपलब्ध करून देणारे अधिकारी व कर्मचारी एका छताखाली एकत्र येऊन विविध योजनांचे लाभ देतील. जिल्हाधिकारी हे अभियानाचे जिल्हा प्रमुख असतील व इतर सर्व विभाग हे त्यांच्या समन्वयाने काम करतील. या उपक्रमाची पूर्वतयारी १५ एप्रिल ते १५ मे या कालावधीत करण्यात येईल. या कालावधीत नागरिकांना विविध विभागांच्या योजनांची माहिती पोहचविणे, प्रस्तावित लाभार्थ्यांची यादी तयार करणे तसेच त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्यात येतील. जिल्हा व तालुका स्तरावर दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.



## विनम्र अभिवादन

**पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर महाविद्यालयात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन केले.**

## महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात




**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील खारघर येथे होणाऱ्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या तयारीचा शुक्रवारी (दि. १४) राज्य उत्पादन शुल्कमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई व अन्न, नागरी पुरवठामंत्री रवींद्र चव्हाण यांनी आढावा घेतला.

हा कार्यक्रम भव्य दिव्य होण्यासाठी आणि उपस्थित नागरिकांना सोहळ्याचा आनंद घेता येण्यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनाप्रमाणे कामे करण्याचे निर्देश मंत्री महोदयांनी दिले.

खारघर येथील कार्यक्रमस्थळी झालेल्या या बैठकीस खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार प्रशांत ठाकूर, विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, रायगडचे जिल्हाधिकारी योगेश म्हसे, ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महापालिका आयुक्त अभिजित बांगर, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर, पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या नियोजनासाठी बनविलेल्या ३०हून अधिक समित्यांना सोपविलेल्या कामांचा या वेळी आढावा घेण्यात आला. नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बैठक व्यवस्था, **(पान २ वर..)**

## रबाळे एमआयडीसीत कंपनीला आग; एकजण जखमी

**नवी मुंबई : बातमीदार**

रबाळे एमआयडीसीतील कंपनीला शुक्रवारी (दि. १४) सायंकाळी ५ वा. च्या सुमारास आग लागली. प्रशांत थर्मो प्लॅस्टिक असे कंपनीचे नाव आहे. या आगीत एकजण जखमी झाला असून आग विझविण्याचे काम अग्निशमन दलाकडून तातडीने सुरू करण्यात आले.

घटनास्थळी कोपरखैरणे, ऐरोली, वाशी, अग्निशमन दलाचे जवान व तीन वॉटर बाऊजर, एमआयडीसी येथील एकूण चार गाड्या, रिलायन्स अग्निशमन दल व ठाणे बेलापूर इंडस्ट्री असोसिएशनची एक गाडी उपस्थित आहे. आगीचे कारण अद्याप समोर आलेले नाही. अमरीश कश्यप (वय २५) या आगीत जखमी झाले असून त्यांना सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे दाखल केले आहे.

## डॉ. आंबेडकरांच्या कार्यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी -आमदार प्रशांत ठाकूर

### पनवेल येथे जयंतीनिमित्त अभिवादन; मिरवणुकीत सहभाग



अधिक छायाचित्रे पान ८ वर.. (छाया : भालचंद्र जुमलेदार)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशासाठी केलेले कार्य, दलित, बहुजन समाजासाठीचे त्यांचे योगदान अभूतपूर्व आहे. ज्या समर्पित वृत्तीने त्यांनी काम केले ते न भूतो न भविष्यती असे आहे. त्यामुळे सर्वांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यातून सर्वांनी प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनमध्ये शुक्रवारी (दि. १४) मिरवणुकीनंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

पनवेल महापालिका आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून, लोकसहभागातून ढोल-ताशांच्या गजरात लेझीम, चित्ररथासह भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सकाळी ७.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजपचे शहराध्यक्ष जयंत पगडे, **(पान २ वर..)**



# इंदू मिल येथील स्मारक प्रेरणादायी ठरेल

## राज्यपालांचे प्रतिपादन; चैत्यभूमी येथील स्मारकाच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन





**मुंबई : प्रतिनिधी**

इंदू मिल दादर येथे तयार होणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक देशासाठीच नव्हे तर जागतिक स्तरावर सर्वांना प्रेरणा देणारे ठरेल, असे मत राज्यपाल रमेश बैस यांनी व्यक्त केले.

दादरस्थित चैत्यभूमी येथील आंबेडकर स्मारकाच्या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केल्यानंतर आयोजित मुख्य कार्यक्रमात राज्यपाल श्री. बैस बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार राहुल शेवाळे, माजी मंत्री अविनाश महातेकर, ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. उज्ज्वल निकम, आनंदराज आंबेडकर, सुजात आंबेडकर, अखिल भारतीय भिक्खू संघांचे उपाध्यक्ष भदंत डॉ. राहुल बोधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समन्वय समितिचे महासचिव नागसेन कांबळे, चैत्यभूमीचे व्यवस्थापक प्रदीप कांबळे, भारतीय बौद्ध महासभाचे अध्यक्ष उत्तम मगरे यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल रमेश बैस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विविध पैलू असलेले व्यक्तिमत्व होते. वंचित आणि उपेक्षित समाज बांधवांच्या न्याय्य हक्कासाठी ते अहोरात्र लढले. मुंबई शहर हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची कर्मभूमी म्हणून ओळखली जाते. इथेच त्यांनी शिक्षण घेतले आणि जागतिक स्तरावरचे नेतृत्व म्हणून इथेच ते नावारुपास आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रेरणादायी कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचावे यासाठी मुंबई दर्शनच्या धर्तीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'टुरिझम सर्किट'साठी बस सेवा उपलब्ध होणे आवश्यक आहे. शासन या माध्यमातून उपक्रम राबवत आहे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. समता, बंधुता व न्याय ही तत्व समाजामध्ये रुजविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिकवणीवर आपण सर्वांनी चालले पाहिजे असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, आज आपला देश जगात एक सशक्त लोकशाही म्हणून उभा आहे, याचे श्रेय बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाला जाते. समाज सुधारणा केल्यामुळे आज एक सुधारलेला देश म्हणून आपण ओळखले जातो. समाजातील सर्व घटकांना विकास प्रक्रियेत सहभागी करुन घेण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून विविध संस्था स्थापन केल्या आहेत. सारथी, महाज्योती या संस्थांमधून त्या-त्या समाजघटकांसाठी आपण काम करतोय.शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा मंत्र त्यांनी समाजाला दिला. त्यादृष्टीने शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी आम्ही करत आहोत. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून राज्यात ४४१ वसतीगृहे व ९० निवासी शाळांमध्ये ६१ हजार ५०० विद्यार्थ्यांची निवास व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केली जाते. इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणास प्रोत्साहन देत आहोत. त्या शिष्यवृत्तींची संख्या दहा वरून पन्नास करण्याचा निर्णय घेतला आहे.

नागपूर येथील दीक्षाभूमी येथे अनेक सोयीसुविधा उपलब्ध करीत आहोत. त्यासाठी भरीव निधी दिला आहे. त्यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित 'टुरिजम सर्किट' तयार करत आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेला मार्गच खरा विकासाचा मार्ग असून त्याच मार्गाने राज्य शासनाची वाटचाल सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुआयामी व्यक्तिमत्व -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

*यावेळी बोलतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले,भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी दाखविलेल्या मार्गामुळेच आज आपल्या देशाचे नाव जगात आघाडीवर आहे. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून अनेक योजना नव्याने सुरू करत आहोत. त्यासाठी राज्य शासन २०-२२ हजार कोटी रुपयांचा निधी खर्च करीत आहे. बार्टीच्या वतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती साठी ८६१ विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. विविध महामंडळाच्या माध्यमातून रोजगाराभिमुख प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ते शिक्षण देत आहोत. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची व्यवस्था करण्यात येत आहे. इंदू मिल येथील जागतिक दर्जाचे स्मारक लवकरच पूर्ण करणार असून.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त राज्यात 'आनंदाचा शिधा' आपण वितरण करत आहोत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.*


### डॉ. आंबेडकर यांनी दाखवलेला मार्गच खरा विकासाचा मार्ग -देवेंद्र फडणवीस

*भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य अतुलनीय आहे. त्यांनी भारताला दिलेले सविंधान हे अनमोल देणगी आहे. भारत वेगाने विकास करत आहे याचे सर्व श्रेय आपल्या संविधानाला जाते. संविधान ही जगात आपल्याला पुढे नेणारे ठरेल. त्यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आपण काम केले पाहिजे. इंदूमिल येथील स्मारकांचे काम वेगाने सुरु आहे. कामात येणाऱ्या अडथळ्यांबाबत मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेवून अडथळे दूर करण्यात येईल. पुढील वर्षभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारक पूर्ण करणार आहोत. जगाच्या पाठीवर हेवा वाटेल असे स्मारक होणार आहे. लंडन मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य राहीलेले घर महाराष्ट्र सरकारने आपल्या ताब्यात घेतले असून त्या घरामध्ये संग्रहालय सुरू करणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.*

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अभिवादन

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. वर्षा निवासस्थानी झालेल्या या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि वर्षा निवासस्थान येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



### मंत्रालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मंत्रालयात साजरी करण्यात आली. यावेळी मुंबई उपनगरचे पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मंत्रालयाच्या प्रांगणात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली वाहिली.



## अज्ञात कारणावरुन तरुणाची हत्या पनवेल परिसरात उडाली खळबळ

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात कारणावरुन एका तरुणाची अज्ञात व्यक्तीने हत्या केल्याची घटना पनवेल तालुक्यातील कोन-सावळा रस्त्याच्या बाजूला असलेल्या उतारावर अ‍ॅग्रोवन लॉजिस्टीक कंपनीच्यासमोर शुक्रवारी (दि. १४) दुपारी घडली आहे.

कोन-सावळा रस्त्याच्या बाजूला उतारावर अ‍ॅग्रोवन लॉजिस्टीक कंपनीसमोर अज्ञात कारणावरुन २५ ते ३० वयोगटातील तरुणाला गंभीररित्या जखमी करून अज्ञाताने ठार मारल्याची घटना घडली आहे. मृत इसमाची उंची ५ फुट ८ इंच, बांधा मध्यम, वर्ण सावळा असून अंगात काळसर राखाडी रंगाचे हाफ टी-शर्ट, टी-शर्टच्या पुढील बाजूस लाल रंगाची पट्टी व त्याजवळ पांढऱ्या रंगाने अर्बन स्टाईल ऑर्थेटींक/ डीएनएम एनएक्सटी जनरेशन असे इंग्रजी अक्षरात प्रिंट केलेले आहे. तसेच काळ्या रंगाची कार्गो फुल पॅन्ट, पॅन्टच्या खिशाजवळ मँगोज असे प्रिंट केलेले, उजव्या पायात पांढऱ्या रंगाचा शुज आहे. तसेच इसमाच्या गळ्याभोवती लोखंडी साखळी गुंडाळलेली आहे. या इसमाच्या दोन्ही हातावर ब्लेडने वार केलेल्या जुन्या जखमा दिसून येत आहेत. तसेच त्याच्या पॅन्टच्या खिशामध्ये एक ब्ल्यू ट्युथ व विमलच्या दोन पुड्या व चाव्या आहेत. या हत्येमुळे परिसरात खळबळ उडाली असून घटनेची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक जगदीश शेळकर व त्यांचे पथक घटनास्थळी रवाना होवून त्या तरुणाच्या खूनाबाबत तपास सुरु आहे.

## ठाकरेंचा सध्या 'दार खटखटाव भाई...' कार्यक्रम

### मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

जेव्हा उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि संजय राऊत हिंदुत्ववादी होते तेव्हा, दार उघड बये दार.. हे जगदंबे चरणी गाणे म्हणत होते. मात्र जेव्हापासून त्यांनी हिंदुत्व सोडले त्या दिवसापासून ते दार खटखटाव भाई दार खटखटाव असा कार्यक्रम करीत आहेत. कधी ते तेजस्वी यादव, कधी केजरीवाल, कधी टिआरएस अशाच प्रकारे आता ते राहुल गांधीचे हे दार खटखटवायला जातील, अशी टीका मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केली.



वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी जेव्हा उध्दव ठाकरे चालत होते तेव्हा प्रत्येकजण मातोश्रीवर जात होता. मातोश्रीचा आदर होता पण ज्या दिवशी उध्दव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनी मा. बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले त्या दिवसापासून त्यांना मंतासाठी अनेकांच्या दारोदारी भटकावे लागते आहे. मातोश्रीचे महत्व त्यांनीच कमी केले. हर दर पर जो झुक जाए उसे सर नही कहते.. ! अशी टीका आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी केली.

मुंबईत इलेक्टॉनिक माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या प्रश्नांवर बोलताना आमदार ड आशिष शेलार म्हणाले की, केंद्रीय गृह मंत्री अमितभाई शाह यांच्या मुंबई दौऱ्यावर जे बोलत आहेत हे म्हणजे तुफान आण्यापुर्वीची भिती आहे. अमितभाई शाह येणार म्हणजे तुफान येणार त्यामुळे छोटया छोटया बीळात राहणारे प्राणी चिवचिवाट करीत आहेत, असा टोलाही आमदार अ‍ॅड. आशिष शेलार यांनी लगावला.

खासदार संजय राऊत हे सर्टीफीकेट घेऊन ४० खासदार बनवणार असतील तर अशी सर्टीफिकेट आम्ही आमच्या घराबाहेर आले तर देऊ. ते स्वप्नात जगत आहेत अशा स्वप्नात जगणाऱ्यांना एक जालिम उपाय आमच्याकडे आहे आमच्या घराबाहेर यावे आम्ही तो देतो, तसेच संजय राऊत यांनी तरी संविधान धोक्यात आहे हे म्हणू नये संविधानामुळेच त्यांना जामिन मिळाला आहे म्हणून ते जेलच्या बाहेर आहेत, असा टोला त्यांनी लगावला. अनिल परब, हसन मुश्रीफ यांना जो अंतरिम दिलासा वारंवार मिळतोय त्याचीही त्यांनी आठवण करून दिली.

### राऊतांचाही घेतला समाचार

***रात्री साडेनऊला लोक टिव्ही लावतात कारण त्यावेळी सिरियल सुरू होतात आणि सकाळी साडेनऊ वाजता लोक टिव्ही बंद करतात कारण त्यावेळी सिरियल किलर बोलायला येतात, अशा शब्दात त्यांनी संजय राऊत यांचा समाचार घेतला.***

## ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा -डॉ. महेंद्र कल्याणकर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण -२०२२ पुरस्कार प्रदान सोहळ्यांत येणाऱ्या वृद्ध श्री सदस्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करण्यात आली असून कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यत ज्येष्ठ नागरिकांना सुलभरीत्या येण्यासाठी रिक्षाची सुविधा, अतिवृद्ध नागरिकांसाठी व्हीलचेअर, आरोग्याच्या प्रश्न उद्‌भवल्यास स्ट्रेचर आदीचा समावेश असणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी शुक्रवारी येथे दिली.

महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या नियोजनासाठी आज आपत्ती व्यवस्थापन समितीची बैठक विभागीय आयुक्त डॉ. कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त राजेश नार्वेकर, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक कैलास शिंदे, रायगड जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे आदि उपस्थित होते.महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्यासाठी उपस्थित राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने तसेच आपत्कालीन परिस्थितीत उद्भवणाऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी ३० ते ३२ विविध समित्या कार्यरत आहेत, असे सांगून विभागीय आयुक्त म्हणाले की, कार्यक्रमाच्या ठिकाणीचे व्यवस्थापन करण्यासाठी नेमलेल्या समित्यांनी समन्वय साधून कामे पूर्ण करावीत. एवढ्या मोठ्या प्रमाणात पहिल्यांदाच लोक जमा होणार आहेत. त्यामुळे या ठिकाणी आपत्ती व्यवस्थापनाचे काम सुनियोजन पध्दतीने व्हावे. उपस्थित नागरिकांना पिण्याचे पाणी, शोचालय आदींची सोय आज रात्रीपर्यंत पूर्ण करावेत. कार्यक्रमस्थळी २ हजार १०० नळ सिस्टीम आहे, त्यात १५० प्लंबरची टीम काम करतील. कार्यक्रम स्थळी व परिसरात २२ हजार स्वछतागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सर्व समित्यांनी उद्या सकाळी अकरा वाजेपर्यंत मॉकड्रील करावे जेणे करुन पुरस्कार वितरण सोहळयात कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही, अशा सूचना डॉ. कल्याणकर यांनी दिल्या.

पुरस्कार वितरण सोहळ्याच्या दिवशी खारघर व परिसरात मोठ्या प्रमाणात विविध भागातून नागरिक येणार आहेत. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक सुरळीत राहावी यासाठी तसेच गर्दीचे व्यवस्थापन योग्य रित्या करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिकानीही सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. कल्याणकर यांनी केले.

**महाराष्ट्र भूषण पुरस्कार वितरण सोहळा उद्या**

पान १ वरून

### आली शासकीय योजनांची जत्रा

दस्तऐवज उपलब्ध करून देणारी ही कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयात जावे लागते. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयामध्ये जावे लागते. कित्येक वेळा अनेक लोकांना त्यांना शासनाकडून देय असलेल्या योजनांची माहिती नसते आणि माहितीअभावी या योजनांचा लाभ गरजू व्यक्तींपर्यंत पोहचू शकत नाही. त्यामुळे या योजनांचा उद्देश पूर्ण होत नाही. यावर पर्याय म्हणून चाळीसगाव, जामनेर, मुरबाड, कल्याण इत्यादी ठिकाणी जत्रा शासकीय योजनांची सर्व सामान्यांच्या विकासाची नावाचा अभिनव व पथदर्शी उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमात एकाच ठिकाणी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कमीत कमी कालावधीत देण्यात आला आहे.

**मंत्रालय ते विविध यंत्रणांसाठी एसओपी**

केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा आढावा घेऊन या उपक्रमांतर्गत राबवावयाच्या योजनांचे जिल्हानिहाय उद्दिष्ट ठरविण्यात येईल. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेतले जाईल. अभियानाच्या अंमलबजावणीसाठी मंत्रालयस्तर ते तालुकास्तर व विविध यंत्रणांसाठी कार्यपद्धतीही 'एसओपी' निर्धारित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने विविध स्तरावरील जबाबदाऱ्यांचे वाटपही करण्यात आले आहे. योजनेची माहिती पोहचवून, अर्ज भरून घेणे ते लाभार्थ्यांची निवड आणि प्रत्यक्ष लाभ देणे इथपर्यंत प्रणाली निश्चित करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात

स्वच्छतागृहे, घनकचरा व्यवस्थापन, वाहनतळ व्यवस्था, परिवहन व्यवस्था, आरोग्य व्यवस्था आदींची चोख व्यवस्था करण्याचे निर्देश या वेळी देण्यात आले. कार्यक्रम शांततेत व नियोजित पद्धतीने होईल याची सर्वांनीच दक्षता घेण्याच्या सूचना मंत्री शंभूराज देसाई यांनी केल्या.

कार्यक्रमाला आलेले नागरिक व कार्यक्रम संपल्यानंतर जाणारे नागरिकांच्या आरोग्याच्या सुविधेसाठी रुग्णवाहिका, वैद्यकीय पथक आदींची योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश खासदार डॉ. शिंदे यांनी दिले. मंत्री चव्हाण म्हणाले की, एवढ्या मोठ्या संख्येने पहिल्यांदाच नागरिक या ठिकाणी जमणार आहेत. त्यामुळे या नागरिकांना काहीही त्रास होऊ नये, यासाठी यंत्रणांनी नागरी सुविधा पुरविण्यात याव्यात. कामाच्या नियोजनाप्रमाणे आराखड्याची अंमलबजावणी करावी व दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे.

### डॉ. आंबेडकरांच्या कार्यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी-आमदार प्रशांत ठाकूर

आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते भीम अनुयायांनी अभिवादन केले.

या मिरवणुकीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावर आधारित चित्ररथ बनविण्यात आला होता. याबरोबरच रमाबाई महिला मंडळ, शिवाजीनगर यांनी सामुहिक गायन केले. या मिरवणुकीची सांगता डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाजवळ करण्यात आली. या ठिकाणी उपायुक्त विठ्ठल डाके यांनी महापालिकेच्यावतीने मिरवणुकीत सहभागी झालेल्या विविध संघटना, महिला मंडळे, पोलीस विभाग, वाहतूक पोलीस, वर्गणीदार सर्वांचे आभार मानले, तसेच मिरवणुकीतील स्पर्धेत सहभागी झालेल्या ढोल-ताशा मंडळे, लेझीम पथके, चित्ररथ आणि वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे क्रमांक जाहीर आले. माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तसेच विविध स्पर्धेतील विजेत्यांना बुद्धपौर्णिमेला होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये बक्षीस वितरण होणार असल्याचे घोषित करण्यात आले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

## पनवेल, उरण परिसरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती शुक्रवारी पनवेल तालुक्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. जयंत्तीनिमित्त सुकापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती २०२३, पालीदेवद ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने तक्षशिला बुद्धविहार येथे तसेच ओम शिवा कॉम्प्लेक्स यांच्या वतीने धम्मगिरी बुद्धविहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत्तीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांना भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, सुकापूर ग्रामपंचायतीच्या सरपंच योगिता पाटील, उपसरपंच दिवेश भगत, ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, केतन केणी, चेतन केणी, पुष्पा म्हसकर, प्राची जाधव, पूनम भगत, भाजपचे सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील, प्रमोद भगत, प्रवीण सावंत, प्रिया वाघमारे, प्रमोद सावंत, के. सी. पाटील गुरुजी, मयूर कदम आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक उपस्थित होते.



**कळंबोली : भाजप कळंबोली जनसंपर्क कार्यालय येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. या वेळी भाजप शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा, शहर उपाध्यक्ष विनोद बोरसे, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष भटके विमुक्त आघाडी बबन बारगजे, उत्तर भारतीय शहर अध्यक्ष केशव यादव, भटके विमुक्त आघाडी शहर अध्यक्ष आबा घुटुकडे, शहर उपाध्यक्ष संदीप भगत, प्रभाग ८ अध्यक्ष प्रकाश शेलार, शहर सचिव दत्ता बिनवडे, मचिंद्र कुरुंद, अमृतलाल चव्हाण, सदाशिव दुबे, भाजप युवा नेता संदीप म्हात्रे, कार्यालयीन चिटणीस जगदिश खंडेलवाल आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## सीकेटी महाविद्यालयात महामानवाची जयंती साजरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयात (स्वायत्त) सेलीब्रेशन ऑफ नॅशनल डेज समितीच्या वतीने शुक्रवारी (दि. १४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

या वेळी समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम प्रतिमा पूजनाचा कार्यक्रम झाला. या वेळी प्रा. जी. एस. साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षणाबद्दल माहिती दिली व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन चरित्रावर विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. ए. डी. वाठारकर यांनी केले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री उद्धारासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. या सत्रासाठी महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. व्ही. एस. कांबळे हे प्रमुख वक्ते लाभले होते. या वेळी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध प्रसंगांचा आढावा घेत त्यांच्या कार्याबद्दल व जीवन चरित्राची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रिया चौधरी (एस. वाय. बी. एस. सी.) हिने केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेलीब्रेशन ऑफ नॅशनल डेज समितीचे प्रमुख प्रा. एस. एल. खैरनार तसेच प्रो. डॉ. यू. टी. भंडारे, प्रा. एम. एम. आंबुलगेकर, डॉ. आर.ओ. परमार, महाविद्यालयाचे ग्रंथपाल आर. ए. नवघरे, प्रा. एस. एस. कांबळे, प्रा.जी. एस. साठे, डॉ. जे. एम. पावरा, सांस्कृतिक विभागाचे समन्वयक गणेश जगताप व समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर यांनी कौतुक केले. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला.

## निवडक

### दोन अपघातांमध्ये एक जण जखमी

**पनवेल :** परिसरातील कळंबोली सर्कल आणि तळोजा येथे झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना घडली आहे. पनवेलमध्ये राहणारे मनोज मंडल आपली कार घेऊन मुंबई–पुणे महामार्गावरून प्रवास करत असताना कळंबोली सर्कलजवळ एका टँकरची त्यांच्या कारला धडक बसली. या अपघातामध्ये सुदैवाने कोणी जखमी झाले नाही, परंतु कारचे नुकसान झाले आहे. या प्रकरणी टँकरचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर दुसऱ्या घटनेत तळोजा सेक्टर ११ येथे शिवाणी शिंदे या आपला किराणा दुकान बंद करून घरी जाताना एका कारची (एमएच ०३ बीएम ४९८०) त्यांच्या स्कूटीला धडक बसली. यामध्ये शिवाणी या जखमी झाल्या असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. या प्रकरणी कारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### कंपनीत १३ लाखांचा अपहार

**पनवेल :** कंपनीच्या खात्यातून दुसऱ्या कंपनीच्या खात्यात हस्तांतरण करून कंपनीमध्ये १३ लाख रुपयांचा अपहार केल्याची घटना कळंबोलीत घडली आहे. याप्रकरणी कंपनीने कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. कळंबोलीमधील सीजी डारसल कंपनीमध्ये आर्थिक वर्षाच्या अखेरीस आर्थिक व्यवहाराचे लेखा परीक्षण केले असता ३० जानेवारी ते ३१ मार्चदरम्यान कंपनीच्या खात्यातून आर. एन. कॅरियर या कंपनीच्या खात्यावर १३ लाख ३५ हजार रुपये हस्तांतर करण्यात आल्याचे दिसून आले. संबंधित कंपनीशी कोणतेही व्यवहार सीजी डारसल कंपनीमार्फत केलेले नसताना व्यवहार सांभाळणाऱ्या एक व्यक्तीने ही रक्कम संबंधितांच्या खात्यावर वर्ग केली असल्याचा संशय कंपनीकडून व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एक कर्मचाऱ्याच्या विरोधात अपहाराचा गुन्हा दाखल झाला आहे.

### पनवेलमधून मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळील राजे कॉप्लेक्स बिल्डींगमधील पार्किंगमध्ये उभी केलेली मोटरसायकल अज्ञाताने चोरून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. दुंदरे गावातील गणेश महादु उसाटकर यांनी त्यांची पाच हजार रुपये किमतीची काळी हिरो होंडा कंपनीची स्पेंडर मोटरसायकल (एमएच ०६ यु ९९६२) ही छत्रपती शिवाजी महाराज चौकजवळील राजे कॉप्लेक्श बिल्डींगमधील पार्किंगमध्ये उभी करून ठेवली होती, मात्र अज्ञात चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेली. याप्रकरणी गणेश उसाटकर यांनी शहर पोलीस ठाण्यात चोरीची तक्रार दाखल केली आहे.

### मिठाईच्या दुकानात चोरी

**पनवेल :** खारघर परिसरातील एका मिठाईच्या दुकानात अज्ञात चोरट्याने दुकानाचे शटर उचकटून आतमध्ये कॅश काउंटरमध्ये असलेले एक लाख ३० हजार रुपये चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर सेक्टर ७ मधील बिकानेरवाला दुकानामध्ये पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानाचे शटर उचकटून आतमधील कॅश काउंटर स्क्रू ड्रायव्हरच्या सहाय्याने उचकटत आतमधील एक लाख ३० हजार रुपये चोरून नेले. सकाळी दुकान उघडण्यासाठी मॅनेजर आल्यानंतर हा प्रकार निदर्शनास आला. याविषयी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उरणमध्येही डॉ. बाबासाहेबांना अभिवादन



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२वी जयंती महोत्सव बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८४३च्या वतीने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे साजरा करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले.

या वेळी आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, माजी नगरसेवक रवी भोईर, कौशिक शाह, राजेश ठाकूर, प्रदीप नाखवा, सागर मोहिते, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८४३चे अध्यक्ष प्रकाश कांबळे, उपाध्यक्ष हरेश जाधव, चिटणीस विजय पवार, सामाजिक कार्यकर्ते महेश भोसले, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश ठाकूर, उरण नगर परिषदेचे कर्मचारी, बौद्धजन पंचायत समिती शाखा क्र. ८४३ चे सर्व सदस्य, माता रमाई महिला मंडळ कमिटी अध्यक्ष सुनिता सपकाळे, हर्षद कांबळे आदी उपस्थित होते. दरम्यान, शहरात विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



**पनवेल : भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या वेळी माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, के. सी. पाटील गुरुजी, मयूर कदम आदी उपस्थित होते.**

## तीन वाहनांचा विचित्र अपघात सुदैवाने जीवितहानी नाही

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत मुंबई–पुणे एक्सप्रेस हायवे रोडवर मुंबई लेनवर पहाटेच्या सुमारास तीन वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र वाहनांचे नुकसान झाले आहे.

मुंबई–पुणे द्रुतगती महामार्गावर अशोक लेलँड टेम्पोचालक प्रकाश सुर्वे (रा. पुणे) हे त्यांच्या ताब्यातील टेम्पो (एमएच १४ केक्यू ९६४८) घेऊन मुंबई बाजूकडे शोल्डर लेन वरून चालवत घेऊन जात होते, मात्र अचानक उजवीकडे गाडीचे वळण घेतल्याने पाठीमागून आलेल्या टाटा टेम्पो (एमएच १४ बीई ६७७२) वरील चालक पिरअली अहमद कुरेशी (रा. उत्तर प्रदेश)ची जोरात धडक बसली.

या अपघातात टाटा टेम्पोचे स्टेरिंग रोड तुटल्याने टेम्पो जागीच उभा असताना त्याच दरम्यान, त्याच्या पाठीमागून अशोक लेलँड ट्रक (एमएच १२ एमव्ही ७७१६) वरील चालक तानाजी जामकर (रा. सोलापूर) यांनी उभा असलेल्या टेम्पोला पाठीमागून धडक दिली. या अपघातात सुदैवाने कोणालाही दुखापत झाली नाही, मात्र वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सदर घटनेची माहिती मिळताच पळस्पे मोबाईल स्टॉप व आयआरबी स्टाफ यांनी घटनास्थळी दाखल होत अपघातग्रस्त वाहने सुरक्षितरित्या रस्त्याच्या बाजूला केली.

## मल्लनिस्सारण काम पूर्ण करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील कुंभारवाडा परिसरातील संत गोरा कुंभार मार्ग या ठिकाणी चालु असलेले मल्लनिस्सारण बाबतचे काम लवकर पुर्ण करावे, अशी मागणी संत श्री गोरा कुंभार प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे. याबाबत प्रतिष्ठानमार्फत पालिका आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे.



कुंभारवाडा परिसरातील मल्लनिसारण काम बंद असुन यामुळे नागरिकांना अडथळा निर्माण झाला आहे. तसेच येत्या १८ एप्रिल रोजी संत गोरोबा काका पुण्यतिथी असुन येथील मंदिर परिसरामध्ये कार्यक्रम होतील. त्यामुळे या ठिकाणी सुरू असलेले मल्लनिस्सारणचे काम लवकर पूर्ण करावे, अशी मागणी संत श्री गोरा कुंभार प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शिवसेना उपशाखा प्रमुख प्रतीक वाजेकर हे सुद्धा यासंदर्भात पाठपुरावा करत आहेत.











पनवेल : तालुक्यातील गव्हाण, खारकोपर, शेलघर, शिवाजीनगर या चार गावांची ग्रामदेवता श्री शांतादेवी (संतुबाय)ची यात्रा व पालखी शुक्रवारी सुरू झाली. त्यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी देवीचे दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख, वसंतशेठ पाटील, जयवंत देशमुख, व्ही. के. ठाकूर, सुनील कोळी, अनंताशेठ ठाकूर, अशोक कडू, अजय भगत, अनंत ठाकूर, कमलाकर देशमुख, शेखर देशमुख, किसन पाटील, प्रकाश देशमुख, अमृत भगत आदी मान्यवरांसह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

# अस्मानी संकट

यंदा चैत्रातच वैशाख वणवा जाणवत आहे. राज्यात पारा चाळीशीपार जात असून सकाळी १० वाजल्यापासूनच उन्हाचे चटके बसत आहेत. दुसरीकडे राज्यामध्ये अवकाळी पावसाचेही थैमान सुरू आहे. अनेक भागांत गारपिटीसह 'अवकाळी'चा तडाखा बसत आहे. याचा सर्वांत जास्त फटका बळीराजाला बसत असून साऱ्यांनाच त्रास सहन करावा लागत आहे.

**अलिकडच्या काही वर्षांमध्ये ऋतूचक्र बदलले आहे. यामध्ये इतका बदल झालाय की सध्या नेमका कोणता ऋतू आहे असा प्रश्न पडतो, कारण पाऊस आणि उष्म्याचा प्रकोप एकाच वेळी होतोय. पूर्वी जून ते सप्टेंबर या पावसाळ्याच्या चार महिन्यांत पाऊस पडत असते. मग पुढील चार महिने थंडी आणि मग त्यानंतरच्या चार महिन्यांत उन्हाळा असे समीकरण ठरलेले. हल्ली मुसळधार व सक्रिय पाऊस सुरू होतो तो जुलै महिन्यात. मग एक महिना लांबून ऑक्टोबरपर्यंत त्याचा मुक्काम असतो. त्यानंतरही पाऊस हिवाळ्यापर्यंत अधूनमधून बरसात करतो, पण आता चक्क उन्हाळ्यातही वरुणराजा बरसतोय. ऋतूचक्रातील बदलाचा असाच थंडीवर परिणाम दिसून आला. सुरुवातीला व मध्यंतरी काही काळ गारवा जाणवला. त्यानंतर मात्र थंडी गायबच झाली. प्रदुषणामुळे शहरांत तर धुके दुरापास्तच झाले आहे. त्याची जागा कंपन्यांमधून सोडल्या जाणाऱ्या वायूंनी घेतलीय. सद्यस्थितीत एकाच वेळी उष्मा आणि अवकाळी पाऊस यांचा संगम पहावयास मिळत आहे. तापमानाचा पारा हा हा म्हणता चाळीसच्या वर जाऊन पोहचला आहे. त्यामुळे अंगाची लाही लाही होत आहे. अनेकांना या कडक उन्हांच्या झळांमुळे उष्माघाताचा त्रास जाणवत आहे. विशेषत: ज्येष्ठ, लहान मुलांना खूप त्रास होत आहे. मध्येच अवकाळी पाऊस हजेरी लावतो. काही ठिकाणी गारपीटही होतेय. याचा सर्वांत जास्त फटका शेतकरीवर्गाला बसला आहे. शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांचे 'अवकाळी'मुळे सातत्याने नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे बागायतदारांच्या फळपिकांना हानी पोहचत आहे. सध्या आंब्याचा हंगाम सुरू असून अवकाळी पावसामुळे काढणीला आलेले आंबा पीक धोक्यात आले आहे. याशिवाय वीटभट्टी व्यावसायिक हवालदिल झाले आहेत. अवेळी पडत असलेल्या या पावसामुळे अगोटच्या कामांमध्ये व्यस्त असलेल्यांना लोकांनाही काय करावे हे सुचेनासे झाले आहे, तर ऐन लग्नसराईत वऱ्हाडींची त्रेधातिरपीट उडाल्याचे पहावयास दिसत आहे. ज्यांच्या घरात लग्नकार्य आहेत त्यांना एकाच वेळी उकाडा आणि अवकाळी पावसाने विवंचनेत टाकले आहे. एकूणच बळीराजासह साऱ्यांनाच या बदलत्या हवामानाने विचार करायला लावला आहे. शासन, प्रशासन आपल्या पातळीवर मदत, उपाययोजना करीत आहे, पण असे का होतेय याचा आता प्रत्येकाने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सर्रास वृक्षतोड, उत्खनन, प्रदूषण या गोष्टी निसर्गाला मारक ठरत आहेत, मग निसर्गही आपले रौद्र रूप अशा वेगवेगळ्या माध्यमांतून दाखवत आहे. निसर्गाशी छेडछाड केली तर मानवाच्या मुळावर येते हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. तरी मानव सुधारायला तयार नाही. अजूनही वेळ गेलेली नाही. निसर्गाकडून सारे काही वेळच्या वेळी पाहिजे असेल तर आपण स्वत: जबाबदारीने वागले पाहिजे. काही गोष्टींचे भान बाळगायला हवे. निसर्गाचा सन्मान राखल्यास तोही भरभरून देईल हे वेगळे सांगायला नको.**

# शासन निर्णयामुळे तृतीयपंथीही विकासाच्या प्रवाहात



तृतीयपंथी म्हटले की, आपल्या लगेच चेहऱ्यावरचे भाव बदलतात. आपल्याच समाजातला एक घटक किंवा नैसर्गिकपणे आपल्याहून जरा वेगळे जन्मलेले पण आपल्यासारखे माणूसच असणारे कुणीतरी असा विचार पटकन कुणाच्या मनात येत नाही.तृतीयपंथीयांना जन्मभर हेळसांड सहन करत जगावे लागते. त्यांचे माणुस म्हणून असणारे सर्व अधिकार नाकारले जातात. तृतीयपंथी अर्थात ज्यांना समाज हिजडा, किन्नर वा छक्का म्हणून ओळखतो. त्याच्याबद्दल नेहमीच समाजातील इतर स्तरांच्या मनात एक नावडती भावना राहिलेली आहे.


तृतीय वर्गाला जाणून-बुजून वाळीत टाकल्यासारखे लोक वागवतात. शरीरातील बदलामुळे पुरुष असूनदेखील त्यांना स्त्री सारख जगावं लागत. अर्थात तृतीयपंथी बनण्यासाठी त्यांच्यावर कोणी जबरदस्ती करत नाही, परंतु समाजातील इतर वर्ग जवळ करत नसल्याने त्यांना निकृष्ट जीवन जगण्यास भाग पडते. काही तृतीयपंथी उच्च शिक्षीत असूनदेखील केवळ त्यांच्या अशा असण्यामुळे त्यांना कामावर ठेवले जात नाही. परिणामी लोकांपुढे हात पसरवून भीक मागण्याची वेळ त्यांच्यावर येते. आपल्या आसपास नेहमीच आपल्याला या वर्गाचे दर्शन होत असते उगाच म्हणून ते कधीही कुणाला त्रास देत नाहीत. (काही अपवादात्मक अनुभव सोडले तर कारण प्रत्येक वर्गामध्ये एक असा घटक असतोच जी संपूर्ण वर्गाचे नाव खराब करतो.) त्यांना पाहिल की बऱ्याच जणांच्या मनात एक किळसवाणी भावना उत्पन्न होते. त्याचप्रमाणे त्यांच्याबद्दल कुतुहलदेखील जागे होते. तृतीयपंथी वर्गाबद्दलच्या जास्त प्रमाणात अफवाच लोकापर्यंत पोहचल्या आहेत. ज्यामुळे या वर्गाची इतर समाजापुढील प्रतिमा मलीन झाली आहे.

या वर्गातील लोकांसमोर वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात अनेक पेचप्रसंग, कायदेविषयक अडचणी उभ्या राहतात. आतापर्यंत प्रशासकीय समित्यांमध्ये नामनिर्देशित उमेदवार म्हणून सहभाग असो किंवा महाविद्यालयातील प्रवेश, नोकरी, उद्योग अशा विविध क्षेत्रात यांना पदोपदी विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र तृतीयपंथीयांच्या समस्या नेमक्या कोणत्या विभागाने सोडविणे? हा नेहमीचाच प्रश्न. आतापर्यंत सरकार-दरबारीसुध्दा याचे निराकरण झाले नव्हते, परंतु शिंदे-फडणवीस शासनाने या वर्गाला मोठा दिलासा दिला आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नेहमीच आपल्या भाषणात म्हणतात हे सामान्य जनतेचे, गोरगरीबांचे, शेतकऱ्यांचे सरकार आहे. या शासनाने आतापर्यंत घेतलेले सर्व निर्णय हे जनतेच्या हीतासाठी घेतले आहेत. हे लोकाभिमुख शासन आहे आणि समाजातील प्रत्येक घटकाचा सर्वांगिण विकास साधने हा या शासनाचा मुख्य उद्देश आहे. तृतीयपंथी हा समाजाचा अविभाज्य घटक आहे. समाजातील इतर सर्व घटकांच्या विकासासोबच या घटकाचाही सर्वांगिण विकास व्हावा यादृष्टीने या शासनाने ऐतिहासिक असा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

तृतीयपंथ या समाज घटकांची सर्वांगिण उन्नती व्हावी व त्यांना समाजाच्या विकास प्रवाहात आणण्यासाठी तसेच तृतीयपंथीयांना भेदभावरहित वागणूक देण्यासाठी सर्व शासकीय विभाग आणि सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या आस्थापनेवरील सर्व पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये अर्ज/ आवेदनपत्रावर लिंग पर्याय म्हणून पुरुष व स्त्री घटकाबरोबर तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करून देण्यात यावा असा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच तृतीयपंथीय घटकाला नोकरी, शिक्षण क्षेत्रासह सर्व शासकीय योजनांमध्ये जिथे जिथे लिंगाबाबत विचारणा करण्यात येईल तिथे तिथे पुरुष/ स्त्री या पर्यायासोबत तृतीयपंथी हा लिंग पर्याय उपलब्ध करून देण्यात यावा, मात्र त्या बाबींसाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याने आवश्यक अर्हता विहित करावी किंवा असलेल्या अर्हतेची पूर्तता तृतीयपंथीयांना करावी लागेल.

**-प्रवीण रा. डोंगरदिवे, उपसंपादक, विभागीय माहिती कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई**

# महान चित्रकार, संशोधक लिओनार्दो दा विंची



लिओनार्दो दा विंची हा चित्रकार आणि संशोधक त्याच्या कामामुळे नेहमीच गूढ वाटत आलेला आहे. त्याची चित्रे असोत वा त्याने लावलेले शोध असोत, त्यात अनेक रहस्ये दडलेली आहेत. त्याचे अनेक शोध हे काळाच्या पुढचे वाटतात. हे शोध त्याने कसे लावले असावेत हे आजही एक रहस्य आहे. त्याचं उलट लिहिणं त्याच्या कामाला आणखीच गूढ बनवतं. हे तर सोडाच, मोनालिसाचं हसू आणि तिचे डोळे आजही संशोधकांना गोंधळात पाडतात. रेनेसान्स काळातील एक महान चित्रकार आणि संशोधक म्हणून संपूर्ण जग त्याला ओळखतं. आज लिओनार्दो दा विंची यांचा जन्मदिन त्यानिमित्त वाचूयात त्यांच्याबद्दल काही रंजक गोष्टी.

लिओनार्दो दा विंची यांचा जन्म १५ एप्रिल १४५२ इटलीच्या फ्लॉरेन्स प्रांतातल्या विंची या गावी झाला. ते एका सधन वकिलाचे अनौरस पुत्र होते. त्यांचा सांभाळ पाच वर्षापर्यंत आईने केला. त्यांचं शिक्षण हे घरीच झालं, कारण त्याकाळात इटलीत औपचारिक शिक्षण नव्हते. लिओनार्दो हे आकाशाचा रंग निळा का आहे याचं बरोबर उत्तर देणारे पहिले शास्त्रज्ञ होते. लिओनार्दो यांना एकावेळी एका हाताने लिहिणं आणि दुसऱ्या हातांनी चित्र काढणं दोन्ही गोष्टी यायच्या.

कॉन्टॅक्ट लेन्सची कल्पना मांडण्याचं श्रेय लिओनार्दो दा विंची यांच्याकडे जातं. मोनालिसाबद्दल अनेक मतं मांडली जातात. एका मताप्रमाणे ती गरोदर असल्याने ती स्मित करत आहे. दुसऱ्या एका मताप्रमाणे मोनालिसा म्हणजे लिओनार्दो स्वतः आहेत. म्हणजेच त्यांनी स्वतःला स्त्री वेशात उभं केलं आहे.

लिओनार्दो दा विंची यांनी त्याकाळात जे शोध लावले त्यांच्याकडे एकदा नजर टाकली की समजतं ते काळाच्या किती पुढे होते. त्यांनी १५ व्या शतकात पॅराशुट, हेलिकॉप्टर, विमान, झुलता पूल मोटरकार इत्यादी गोष्टींची संकल्पना मांडली होती. लिओनार्दो यांच्या एकूण कामाकडे बघता त्यांचं आणि चर्चचं कधी पटलेलं दिसत नाही. त्यांनी बायबलमधल्या नोहाच्या जलप्रलयाच्या गोष्टीला खोडून काढलं होतं.

मी देवाला आणि मानवजातीला दुखावलं आहे कारण माझं काम जितक्या दर्जाचं व्हायला हवं होतं तेवढं झालं नाही..., असे लिओनार्दोंचे शेवटचे शब्द काहीसे असे होते.

**-सिद्धार्थ गायकवाड**



## बदलते तंत्रज्ञान

# अरे व्वा! व्हॉट्सॲपने एकाच वेळी आणले तीन फीचर्स



व्हॉट्सॲप हे जगभरात सर्वाधिक वापरले जाणारे इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म आहे. कंपनीने तीन नवीन फीचर्स जारी केले आहेत, जे चांगल्या सुरक्षिततेसाठी आहेत. नवीन अपडेटमध्ये अकाऊंट प्रोटेक्ट, डिव्हाइस व्हेरिफिकेशन आणि ऑटोमॅटिक सिक्योरिटी कोडचे फीचर्स जोडण्यात आले आहेत.


**व्हॉट्सॲप अकाऊंट प्रोटेक्ट :** व्हॉट्सॲपच्या या फीचरमुळे युजर्सना सुरक्षेचा एक नवीन स्तर मिळतो. जेव्हा एखादा युजर आपला फोन बदलतो आणि नवीन फोनमध्ये व्हॉट्सॲपवर लॉग इन करतो, तेव्हा त्याला ओटीपी व्यतिरिक्त आणखी एक स्टेप फॉलो करावी लागेल. ओटीपी टाकल्यानंतर, युजर्सच्या जुन्या फोनवर एक सूचना दिसेल, ज्यामध्ये युजर्सना नवीन डिव्हाइसवर स्विच करायचे आहे की नाही हे विचारले जाईल. हे फीचर आपोआप चालू राहील आणि यासाठी कोणत्याही सेटिंगमध्ये जाण्याची गरज नाही.

**डिव्हाइस व्हेरिफिकेशन** : नवीन फीचर व्हॉट्सॲप युजर्सचे डिव्हाइस हॅक झाल्यास त्यांचे संरक्षण करेल. व्हॉट्सॲपनुसार, मालवेअर हा कोणत्याही स्मार्टफोनसाठी सर्वात मोठा धोका असतो. मालवेअरच्या मदतीने, युजर्सच्या व्हॉट्सॲपवरून मेसेज पाठविला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत व्हॉट्सॲपचे हे फीचर युजर्सच्या खात्याचं संरक्षण करेल.

**व्हॉट्सॲपऑटोमॅटिक सिक्योरिटी कोड** : व्हॉट्सॲप चॅट्स एंड-टू-एंड एन्क्रिप्शनसह येतात. कंपनीच्या म्हणण्यानुसार, चॅटमध्ये उपस्थित असलेल्या लोकांशिवाय इतर कोणीही ते मेसेज वाचू शकत नाही. युजर्स मॅन्युअली तपासू शकतात की त्यांचा संपर्क एनक्रिप्शन वापरत आहे की नाही.

आता कंपनी ऑटोमॅटिक सिक्युरिटी कोड फीचर जोडत आहे. या फीचरच्या मदतीने, युजर्स त्यांच्या चॅट्स एनक्रिप्टेड आहेत की नाही हे ऑटोमॅटिक व्हेरिफाय करू शकतात. यापूर्वी यासाठी लाँग प्रोसेस करावी लागत होती. एका हिंदी वेबसाईटने याबाबतचे वृत्त दिले आहे.

# संत साहित्याचे अभ्यासक विंदा करंदीकर



## निमित्त

विंदा ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित गेली ६५ वर्षे साहित्य क्षेत्रात आहेत. कवी, साहित्यिक, भाषांतरकार, निबंधकार अशा विविधांगांनी वावरणारे गोविंद विनायक करंदीकर उर्फ विंदा करंदीकर यांचा 'ज्ञानपीठ पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. भारतातील ज्ञानपीठ सारखा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे वि. स. खांडेकर आणि वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यानंतर विंदा मराठी साहित्यातील तिसरे साहित्यिक आहेत. भारतीय साहित्य क्षेत्रातील हा बहुमान खरं तर त्यांना केव्हाच मिळायला हवा होता, पण उशिराने का होईना त्यांचा योग्य तोच सन्मान झाल्याची प्रतिक्रिया साहित्य वर्तुळात उमटली. त्यांचा आज स्मृतीदिन त्यानिमित्त त्यांच्याविषयी या लेखातून जाणून घेऊया...

ज्येष्ठ विचारवंत एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार निवड समितीची बैठक शनिवारी दिल्लीत पार पडली आणि लगेचच रविवारी ह्याची अधिकृत घोषणा करण्यात आली. पाच लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. 'रसिकांनी मला भरभरून प्रेम दिले. माझ्यादृष्टीने रसिकांचे प्रेम हाच खरा सन्मान आहे. पुरस्कार वगैरे उपचार असतात. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नाही, तर मराठी भाषा, कविता आणि काव्य परंपरेचा हा सन्मान आहे,' अशा शब्दांत विंदांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

काव्यवाचनाचा प्रकार फारसा रूढ नसतानाही वसंत बापट, मंगेश पाडगावकर आणि विंदा या तिघांनी काव्यवाचनाच्या जाहीर कार्यक्रमांचे अनेक फड रंगवले आहेत. १९४९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या 'स्वेदगंगा' पासून सुरू झालेला विंदांचा साहित्यिक प्रवास 'मृद्गंध', 'धृपद', 'जातक', 'विरूपिका' आदी काव्यसंग्रह; 'स्पर्शाची पालवी' आणि 'आकाशाचा अर्थ' हे दोन लघुनिबंधसंग्रह; ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवा'चा अर्वाचीनीकरणाचा अभिनव प्रयोग; 'परंपरा आणि नवता' हा मराठी समीक्षालेख संग्रह; फाऊस्ट, राजा लिअर आणि ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र आदी अनुवादीत ग्रंथ.

'राणीचा बाग', 'एकदा काय झाले', 'सशाचे कान', 'एटू लोकांचा देश', 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ' हे काही बालकविता संग्रह. २००३ साली प्रकाशित झालेला 'अष्टदर्शने' या संग्रहापर्यंत येऊन पोहोचतो. 'अष्टदर्शने' या संग्रहात आठ तत्त्वज्ञांचे विचार त्यांनी सोप्या रचनांमध्ये मांडले आहेत. याच संग्रहाकरता त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला आहे. आशयगर्भित पण सोपी शब्दरचना करणारे विंदा आपल्या कवितांतून वैश्विक सत्य धुंडाळत राहिले. त्यांची कविता प्रयोगशील आहे. विंदांच्या काव्यात व्यक्तिगत भावजीवनापासून सामाजिक वास्तवापर्यंतचे व्यापक अनुभव पाहायला मिळतात. विंदांना ललित पारितोषिक समितीचे क्रिटिक्स ॲवॉर्ड, सिनीयर फुलब्राईट, कबीर सन्मान, सोव्हिएत लँड नेहरू लिटररी ॲवॉर्ड, जनस्थान पुरस्कार तसेच साहित्य अकादमीची फेलोशिपही मिळाली आहे.


१९४९ च्या मे महिन्यात विंदांच्या 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली. 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहात अंतर्भूत कवितांची सामाजिक आशयाची कविता, व्यक्तिचित्रणात्मक, प्रेमविषयक, बालजीवनविषयक, चिंतनात्मक, देवगड-राजापूरकडील बोलीभाषेतील कविता अशी वर्गवारी करता येऊ शकते. स्वेदगंगा कवितासंग्रहातून पुढील तीन कविता घेण्यात आल्या आहेत.

**(साभार : मराठी वर्ल्ड)**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : सद्ध्याच्या कडक उन्हामध्ये काही ठिकाणी पाऊस पडत असल्याने प्रचंड उकाडा जाणवू लागला आहे. अशा उकाड्यामध्ये एका टेबलवाल्याने अनोखी शक्कल लढवली आहे. विक्रीसाठी आणलेले लाकडी टेबल उभे-आडवे ठेवून झोपण्यासाठी जागा तयार केली. त्याची ही अनोखी क्षणभर विश्रांती टिपली आहे गणेश धुमाळ यांनी.**



## आरोग्य प्रहर

# जास्त पाणी प्यायल्याने कोणते आजार होतात?



आपल्या शरीराचा बराचसा भाग पाण्याने बनलेला असतो, त्यामुळे आपल्याला दिवसभर तहान लागते. हे द्रव आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित करण्यास आणि डिहायड्रेशनचा धोका दूर करण्यास मदत करते. हेच कारण आहे की आपल्याला नियमित अंतराने पाणी पिण्याचा सल्ला दिला जातो. असं असून सुद्धा आपण हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की पाणी किंवा इतर कोणत्याही द्रव पदार्थाचे जास्त सेवन आरोग्यास फायद्याऐवजी हानी पोहोचवू शकते. त्यामुळे सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

**पिण्याच्या पाण्याची मर्यादा काय आहे?**

आता तुमच्या मनात प्रश्न येतो की पाणी कमी प्यायले तरी नुकसान होते आणि जास्त प्यायले तर? तर काय होतं? याबाबत भारतातील प्रसिद्ध आहारतज्ञ म्हणतात, एका मर्यादेपेक्षा जास्त पाणी पिणे धोकादायक ठरू शकते.

या प्रसिद्ध आहारतज्ञ म्हणाल्या की, आपल्या मेंदूत एक थ्रस्ट सेंटर आहे, जे शरीरातील पाण्याचे प्रमाण दर्शवते. अशा वेळी पेप्टाइडची प्रतिक्रिया येते, जी थ्रस्ट सेंटरला सिग्नल देते की आता पाणी पिण्याची गरज आहे.

काही लोकांना तहान लागल्यावर जास्त पाणी पिण्याची सवय असते, पण तहान न लागता पाणी प्यायल्यास या सवयीला सायकोजेनिक पॉलीडिप्सिया म्हणतात. यामुळे शरीरातील द्रव पदार्थाचे प्रमाण वाढते, जे आरोग्यासाठी चांगले नसते.

**अधिक पाणी प्यायल्याने काय परिणाम होतील?**

जे लोक जास्त पाणी पितात त्यांच्या शरीरातील सोडियमचे प्रमाण कमी होऊ लागते, अशा वेळी पेशींमध्ये पाण्याचे प्रमाण वाढते, ज्यामुळे जळजळ वाढते. याला हायपोनाट्रेमिया म्हणतात, हे विशेषत: मेंदूचे नुकसान करते.

**हायपोनाट्रेमियाची लक्षणे**

डोकेदुखी, थकवा, ऊर्जेची कमतरता, मळमळ, उलट्या, कमी रक्तदाब, मसल्स क्रॅम्प, अस्वस्थता, राग, गंभीर परिस्थितीत व्यक्ती कोमातही जाऊ शकते.

आहारतज्ञ म्हणाल्या की, दिवसातून सुमारे ८ ते १० ग्लास पाणी पिणे पुरेसे आहे, जर आपण यापेक्षा जास्त सेवन केले तर आपण आपल्या शरीराचे शत्रू व्हाल, म्हणून थोडी काळजी घेणे महत्वाचे आहे.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# डॉ. बाबासाहेबांची शिकवण आचरणात आणणे काळाची गरज!

## मुरुड एस. टी. आगारात संयुक्त जयंती साजरी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड एसटी आगारात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती निमित्त मुरुड आगार व्यवस्थापक निता जगताप यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबाच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतीराव फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी मुरुड आगार व्यवस्थापक निता जगताप, मंगेश पाटील, रविंद्र सोनाळे, विकास लोंढे, अजित गंगावणे, श्रीराम भिसे,व्यंकटी इंगळे , प्रकाश दांडेकर,मासलिन रूझार आदिंसह वाहक-चालक व कर्मचारी उपस्थित होते.

समाजाला दिशा दाखवण्यासाठी कष्टकरी मंडळीना ज्यांनी प्रखर विचारांचा वारसा दिला त्या भारतरत्न घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेबांची जयंती बाबासाहेबांनी शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा, असा महामंत्र यांनी दलित जनतेला दिला. डॉ.बाबासाहेब निस्वार्थी होते.त्यांच्या संपुर्ण जीवनात कधीही आणि कुठेही त्यांच्या कामात स्वार्थ दिसला नाही. जे काही केले ते समाजासाठी केले. त्यात शंका नाही. माणासाला माणसासारखे वागण्याचा जीवन जगण्याचा अधिकार मिळवून दिला. तसेच डॉ. बाबासाहेब हे लोकनेते होते. त्यांची शिकवण आचरणात आणणे, हीच आजच्या काळाची गरज आहे, असे मत मुरुड आगार व्यवस्थापक निता जगताप यावेळी व्यक्त केले.

यावेळी मंगेश पाटील यांनीही बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले.

# भाजपतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी, अलिबाग तालुक्याच्या वतिने अलिबागमध्ये भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती साजरी करण्यात आली.

शुक्रवारी (दि. १४) भारतीय जनता पार्टी, अलिबाग तालुक्याच्या वतिने भाजपा जिल्हा कार्यालय, अलिबाग येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

अलिबाग शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आला. भाजपा रायगड जिल्हा उपाध्यक्ष श दिलीप विठ्ठल भोईर, तालुका अध्यक्ष परशुराम



म्हात्रे, राज्य परिषद सदस्य सतीश लेले, तालुका सरचिटणीस संतोष हरिभाऊ पाटील, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस शैलेश नाईक, अनुसूचित जाती मोर्चाचे देवेन सोनावणे, कामगार मोर्चाचे संतोष साखरे, शोशल मिडियाचे पंकज अंजारा, निलेश जोशी, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस जान्हवी पारेख,मापगाव शक्ती केंद्र प्रमुख दिनेश राऊत आणि भाजपा कार्यकर्त यावेळी उपस्थित होते.

# चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**चौक : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार होते, असे गौरवोद्गार ग्रामविकास अधिकारी संजय पोळ यांनी काढले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती शुक्रवारी खालापूर तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतमध्ये मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी संजय पोळ बोलत होते.

आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. ग्रुप ग्रामपंचायत आसरे, ग्रुप ग्रामपंचायत चौक, ग्रुप ग्रामपंचायत तुपगाव, ग्रुप ग्रामपंचायत लोधिवली, ग्रुप ग्रामपंचायत कलोते, ग्रुप ग्रामपंचायत वावर्ले, ग्रामपंचायत वावंढळ, ग्रुप ग्रामपंचायत बोरगाव, ग्रामपंचायत आंबेवाडीवरोसे, ग्रामपंचायत बीड खुर्द येथे सरपंच, उपसरपंच सदस्य, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक व ग्रामस्थ यांच्या उपस्थित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.



(छाया : अर्जन कदम)



(छाया : राज वैशंपायन)

## नागोठण्यात भाजपकडून डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**नागोठणे : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या नागोठणे येथील कार्यालयात कार्यकर्त्यांकडून सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी भाजप रोहा तालुका अध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर, तालुका सरचिटणीस आनंद लाड, जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, तालुका कोषाध्यक्ष प्रमोद गोळे, तालुका उपाध्यक्षा अपर्णा सुटे, जिल्हा परिषद गण अध्यक्ष शेखर गोळे, शहर सरचिटणीस तिरतराव पोलसानी, शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, नागोठणे विभाग सरचिटणीस मुग्धा गडकरी, राजन दुबे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचर १३२ वी जयंती रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरीभागांमध्ये रॅली काढण्यात आल्या.

व्या जयंतीनिमित्त सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे शुक्रवारी (दि.१४) अलिबाग शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांनी गर्दी केली होती. आमदार महेंद्र दळवी यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यला आभिवादन केले. यावेळी माजी नगरसेवक प्रदिप नाईक, ॲड. मानसी म्हात्रे, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळूंखे उपस्थित होते. माजी आमदार पंडित पाटील, सामाज क्रांती आघाडीचे बी. जी. पाटील यांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

या पदयात्रेमध्ये सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी तसेच कार्यालयाच्या अधिनस्त मुलींचे व मुलांचे शासकीय वसतिगृह अलिबाग येथील कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी तसेच जे.एस.एम.महाविद्यालयाचे विद्यार्थी व कर्मचारी व अलिबाग मधील प्रशासकीय अधिकारी आणि प्रतिनिष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

## पदयात्रेला प्रतिसाद

**सामाजिक न्याय विभागातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून ते अलिबाग बीच पर्यंत पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास जिल्हा न्यायालयाचे सत्र न्यायाधीश जगदीश कोकाटे यांच्याहस्ते पुष्पमाला अर्पण करुन पदयात्रेला सुरुवात करण्यात आली.**



# क्षयरोग ग्रस्तांना कोरड्या शिधाचे वाटप

## नालासोपारा येथील सामाजिक बांधिलकी संस्थेचा उपक्रम

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागातील जनतेमध्ये क्षयरोगाचे प्रमाण वाढले आहे. त्या सर्वांना क्षयरोगाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी नालासोपारा येथील सामाजिक संघटनेकडून मदत वाटप करण्यात आली. कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रातील आदिवासी रुग्णांना कोरडया शिधाचे वाटप करण्यात आले.

प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान या महत्वाकांक्षी योजने अंतर्गत संसर्गजन्य आजारामुळे होणा-या मृत्युमध्ये क्षयरोगाचा समावेश प्रमुख १० आजारामध्ये आहे. त्यामुळे संपूर्ण जगामध्ये व भारतामध्ये क्षयरोग आजाराचे व क्षयरोगामुळे होणा-या मृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे. भारताने सन २०२५ पर्यंत क्षयरोगाचे दुरीकरण करण्याचे धोरण निश्चित केले आहे. त्याचाच भाग म्हणून कर्जत तालुक्यातील आदिवासी बहुल भागातील क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी वसई विरार महापालिका हद्दीतील नालासोपारा येथील सामाजिक बांधिलकी संस्था मदतीला आली आहे.कळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात क्षयरोगावर औषधोउपचार घेणाऱ्या सर्व रुग्णांना संस्थेच्या वतीने तीन महिन्याचा कोरडा शिदा देऊन आधार दिला. कळंब प्राथमिक आरोग्य केंद्र हा ग्रामीण आदिवासी भागात असल्याने या केंद्रात उपचार सुरू असलेला बहुतांश गरीब आदिवासी आहे त्यांना ही पोषक आहार मिळवा याकरिता आरोग्य केंद्रा कडून ' निक्षय मित्र' होण्यासाठी विविध सामाजिक संस्थांना आवाहन केले होते.



सामाजिक बांधिलकी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कामेरकर यांनी कळंब आरोग्य केंद्रात क्षयरोगावर उपचार घेणाऱ्या आदिवासी रुग्णांना कोरडा शिदा उपलब्ध करून दिला. क्षयरोग रुग्णांसाठी आवश्यक असलेले गहू,बाजरी, तेल, डाळ,कडधान्य ,दूध पावडर आदी तीन महिन्यांच्या कोरडा शिधा वाटप केला.

यावेळी कळंब ग्रामपंचायत सरपंच प्रमोद कोंडीलकर , आरोग्य अधिकारी डॉ.निलेश यादव, डॉ. दिनेश जोशी, तालुका क्षयरोग निरीक्षक डॉ. नितीन पाटील, सामाजिक बांधिलकी संस्थेचे पदाधिकारी सचिव शेखर पेनकर तसेच संदेश कामेरकर, महेश पेनकर, ज्ञानेश्वर वाडिले, शिवंश पेनकर, कळंब पोलीस चौकीचे पोलीस कर्मचारी सुनील शेंबडे, कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविका कल्पना गायकवाड, आरोग्य सेवक श्याम रोकडे, सुरेश बांगर, दीपक कोलेकर, आरोग्य सेविका कल्पना आडे, दीपाली लोहार, अनिता शेंडे, सविता जाधव, जितेंद्र खांडके, गणेश मानकामे तसेच सामाजिक कार्यकर्ते हनुमान बदे, संतोष बदे आणि आशा सेविका उपस्थित होत्या.


# मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीला सुरुवात

## पावसाळ्याआधी होताहेत उपाययोजना

**खोपोली : प्रतिनीधी**

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर पावसाळ्यात धोकादायक आणि अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या ठराविक पट्ट्यात रस्ता खडबडीत करण्याचे काम आयआरबीकडून हाती घेण्यात आले आहे.

मुंबई पुणे जुन्या महामार्गावर खालापूर ते दांडफाटा या चौदा किलोमीटर पट्ट्यात पावसाळ्यात सातत्याने अपघात घडत आहेत. जुना मुंबई पुणे महामार्ग २०१८ मध्ये करण्यात आलेले डांबरीकरण यामुळे महामार्गावर खालापूर हद्दीत रस्त्याचा पृष्ठभाग काही ठिकाणी अतिशय गुळगुळीत आणि निसरडा बनला होता.



दांड फाटा ते खालापूर यादरम्यान पावसाळयात अपघाताचे प्रमाण प्रचंड वाढत असून ठराविक ठिकाणीच सातत्याने अपघात होत असल्याने अपघाताच्या हॉटस्पॉट ठरले आहेत.

तांत्रिक चुकीमुळे पावसाळ्यात वाहने अनियंत्रित होऊन पलटी होण्याचे प्रमाण वाढले होते . लोधीवली, वावंढळ विणेगाव ,चौक तसेच खालापूर हद्दीत पावसाळ्यात सातत्याने अपघात घडले होते. गेली चार वर्षे सातत्याने खालापूर हद्दीत वरिल धोकादायक ठिकाणी वाहन अनियंत्रित होवून पलटी होवून अपघात घडले होते.रस्ता सुरक्षा उपाययोजना साठी काम करणाऱ्या दिलासा फाऊंडेशन कडून याठिकाणी दुरस्ती साठी आयआरबी अभियंता कडे पाठपुरावा सुरु होता.

अपघात घडणाऱ्या ठिकाणी मिलिंग यंत्र वापरून काम करण्यात आले आहे.

# सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे महामार्गावर वाहतूक कोंडी

**खोपोली : प्रतिनिधी**

सलग तीन दिवस सुट्ट्या त्याप्रमाणे परीक्षा संपल्याने मुलांना सुट्ट्या, यामुळे मोठ्या प्रमाणात मुंबईकर पर्यटनासाठी बाहेर पडल्याने शुक्रवारी सकाळपासून मुंबई पुणे महामार्गावर विशेषत: बोरघाटात वाहनांच्या रांगाच रांगा लागल्याने प्रचंड वाहतुकीचा सामना मुंबईकरांना करावा लागत आहे.

ऐन उन्हाळ्यात वाढलेला कडक उन्हाळा, वरून तापलेला सूर्य अशा गरम वातावरणामुळे गाडीतील प्रवासी घामाघूम झाले आहेत. विशेषतः गाडीतील महिला व लहान मुलांचे वाहतूक कोंडीमुळे हाल होत आहेत.

महामार्ग पोलिसांनी पुणे लेन व्यस्त असल्यामुळे मुंबईला लेनवरून एक लाईन सोडल्याने काही प्रमाणात वाहतूक कासवाच्या गतीने सुरू झाली आहे. शुक्रवारी दुपारपर्यंत परिस्थिती तशीच पाहायला मिळाली.

# महाडमध्ये डॉ. आंबेडकर यांची जयंती जल्लोषात साजरी

**महाड : प्रतिनिधी**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती आज महाड क्रांतीभूमीत उत्साहात साजरी झाली. मध्यरात्री पासूनच महाड मधील चवदारतळे आणि क्रांतीस्थंभ येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी विविध राजकीय पक्षातील पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती महाड क्रांतीभूमीत देखील जल्लोषात साजरी करण्यात आली.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या महाड शहरामधील चवदारतळे आणि क्रांतीस्थंभ याठिकाणी महामानवास अभिवादन करण्यासाठी भीमसैनिकांनी एकच गर्दी केली होती. विविध सामाजिक, राजकीय, धार्मिक, संघटनाच्या प्रतिनिधींनी आज चवदारतळे येथे महामानवास वंदन केले. यावेळी महाडचे आमदार भरतशेठ गोगावले, भाजपचे उपजिल्हाप्रमुख बिपीन म्हामुणकर, भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, निलेश तळवटकर,



महेश शिंदे, रिपब्लिकन पार्टीचे महाड तालुकाध्यक्ष मोहन खांबे, केशव हाटे, रिपब्लिकन पार्टीचे शहर अध्यक्ष प्रभाकर खांबे, बौद्धजन पंचायत समितीचे अध्यक्ष अशोक जाधव, राष्ट्रवादीचे सामाजिक न्याय सेलचे अनंत कांबळे, उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड, महाड नगर पालिकेचे मुख्याधिकारी रोडगे, तहसीलदार सुरेश काशीद, महाड पंचायतसमितीचे गट विकास अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे माजी अध्यक्ष योगेश कासारे, आदींनी चवदारतळे येथे महामानवास अभिवादन केले.

महाड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाडमधील न्यायलय, तसेच आदि शासकीय कार्यालयातून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीमार्फत सालाबादप्रमाणे काढण्यात येणारी भव्य मिरवणूक काढण्यात आली.

## चवदारतळे येथे येवून महामानवास अभिवादन

**महाड शहरातील विविध ठिकाणच्या भीमसैनिकांनी मध्यरात्री क्रांतीस्थंभ आणि चवदारतळे येथे येवून महामानवास अभिवादन केले. संपूर्ण राज्यातून विविध ठिकाणाहून आलेल्या भीमज्योतींचे स्वागत यावेळी चवदारतळे येथे करण्यात आले.**


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग,**
**पनवेल पिनकोड - ४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.com
**दूरध्वनी क्रमांक ०२२ - २७४५२७७८ फॅक्स - - ०२२-२७४६७४४०**
**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. १० ( ई-निविदा) सन २०२३ - २४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२ - २७४५२७७८ फॅक्स - ०२२- २७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑफलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

टिप :- या निविदेमध्ये एकूण ५ कामे समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १५.०४.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक २६.०४.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेली आहे.

ई-निविदा जा.क्र./ सा.बां./पनवेल/----
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक :-

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सा. बां. विभाग, पनवेल**

**विमाका/कोवि/२०२३-२०२४/१६**

# जागतिक स्तरावर विद्यार्थ्यांनी नामवंत व्हावे

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन | केबीपी कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण

**नवी मुंबई : बातमीदार**

विद्यार्थी जीवनात यश, अपयश येत असते, परंतु अपयशाने खचून न जाता आपले करिअर घडवयाचे असते. जीवनात खेळाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. मन प्रसन्न करण्यासाठी खेळ आवश्यक असतो. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्रीडा प्रकारात प्रगती करून स्वतःचे व कॉलेजचे नाव जागतिक स्तरावर नामवंत करावे, असे मत रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात व्यक्त केले.



रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये जिमखाना विभागाच्यावतीने वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन गुरुवारी (दि. १३) करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय जलतरणपटू व शिवछत्रपती पुरस्कार विजेती ऋतुजा उद्देशी व ठाणे बेलापूर इंडस्ट्रीजचे डायरेक्टर सुनील ब्रम्हे तर अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर उपस्थित होते.

सुनील ब्रम्हे यांनी क्रीडा क्षेत्रातील यश विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकरीची विविध संधी उपलब्ध करून देते. तसेच खेळामुळे विविध कौशल्ये आत्मसात करता येतात. त्याचा जीवनात खूप उपयोग होतो. असे प्रतिपादन केले. तर ऋतुजा उद्देशी यांनी आपल्या जडणघडणीतील विविध अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच आपल्या यशामध्ये केबीपी कॉलेजचा खूप मोठा वाटा असल्याचे प्रतिपादन केले. या वेळी महाराष्ट्र टाइम्सचे मनोज जालनावाला यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्हा, विभाग, राज्यस्तर, राष्ट्रीय स्तर व आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा प्रकारात चमकदार कामगिरी करणाऱ्या १६० विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कॉलेजच्या चौफेर प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले व कॉलेजच्या अधिक प्रगतीसाठी प्रयत्न करू, असे प्रतिपादन केले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. जिमखाना चेअरमन प्रा. अर्जुन पोटिंदे यांनी जिमखाना अहवाल सादर केला. सूत्रसंचालन डॉ. आबासाहेब सरवदे, प्रा. धनश्री पछाडे यांनी तर आभार उपप्राचार्य सी. डी. भोसले यांनी मानले. कार्यक्रमाला उपप्राचार्या, डॉ. राजेश्री घोरपडे, उपप्राचार्य चंद्रकांत क्षीरसागर, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार मंदा म्हात्रेंच्या निधीतून उद्यानात सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीतून सिबीडी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात ज्येष्ठ नागरिकांसाठी गजेबो उद्यान तसेच डॉ. हेडगेवार उद्यान (मँगो गार्डन) येथे फाऊंटेन उभारण्यात आलेले आहे. या कारंज्याचे व ज्येष्ठ नागरिकांसाठी उभारलेल्या गजेबोचे उद्घाटन करण्यात आले.



सीबीडी सेक्टर ८ येथील वीर सावरकर मैदानात आदिवासी समाजाकरिता उभारण्यात येणाऱ्या समाजमंदिरचा भूमिपूजन सोहळा नुकताच उत्साहात झाला. हे उद्घाटन सीबीडी बेलापूर विभागातील ज्येष्ठ नागरिक कमल शर्मा व मनोहर बाविस्कर यांच्या हस्ते झाले.

या वेळी भाजप महामंत्री व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे, नगरसेवक अशोक गुरखे, साबू डॅनीयल, स्वाती गुरखे साटम, विलास कदम, राधा ठाकूर, रुक्मिणी पळसकर, स्मिता सावंत, संतोष पळसकर, संजय ओबेरॉय, यशपालसिंग बागल, अलका कामत, सुरेखा बामणकर तसेच शेकडो महिला व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# अग्निशमन दिनानिमित्त शहीदांना आदरांजली

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने शुक्रवारी (दि. १४) अग्निशमन दिनी वाशी अग्निशमन केंद्रात महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते शहीद स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

१४ एप्रिल १९४४ रोजी मुंबई बंदरातील व्हिक्टोरीया गोदीत एक नंबर धक्क्यावर असलेल्या एस. एस. पोर्ट स्टिकीन या जहाजाला लागलेल्या भीषण आगीशी झुंज देताना ६६ अधिकारी व जवान शहीद झाले होते. त्या व त्यानंतरच्या काळातही अग्निविमोचन सेवा करताना शहीद झालेल्या जवानांच्या शौर्याला सन्मान करीत १९६८ पासून १४ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय अग्निशमन सेवा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो.

या वेळी अग्निशमन विभागप्रमुख तथा अतिरिक्त शहर अभियंता शिरीष आरदवाड, विभागीय अग्निशमन अधिकारी पुरूषोत्तम भोईर, केंद्र अधिकारी जे. टी. पाटील व सुशविरकर, सहाय्यक केंद्र अधिकारी ए. आर. भोईर व व्ही. डी. कोळी आणि अग्निशमन जवान यांच्या हस्ते स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करण्यात आली.



अग्निशमन दिनाचे औचित्य साधून १४ ते २० एप्रिल या कालावधीत अग्निशमन सप्ताह साजरा करण्यात येत असून यानिमित्त वाशी अग्निशमन केंद्रात अग्निशमन दलाकडील विविध उपकरणे व सुरक्षा साहित्याचे प्रदर्शन लावण्यात आलेले आहे. आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते या प्रदर्शनाचा शुभारंभ करण्यात आला.

# जासई विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती



**उरण : रामप्रहर वृत्त**

जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि. १४) भारतरत्न, महानायक, क्रांतीसूर्य, बोधिसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२वी जयंती साजरी करण्यात आली.

या वेळी विद्यालयाच्या परिसरातील महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील विद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग, सरपंच संतोष घरत, नरेश घरत, बळीराम घरत, गोपीनाथ ठाकूर, दत्ता घरत, गणेश पाटील, जयश्रीताई कांबळे, लेखनिक सुरेश ठाकूर अनेक मान्यवर व महिला मोठ्या संख्येने विद्यालयात कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

दरम्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती देण्यात आली.

## महाराष्ट्र भूषण कार्यक्रमासाठी नियोजन

# पनवेल मनपा हद्दीतील शाळांना आज सुटी

**कळंबोली : बातमीदार**

ज्येष्ठ निरूपणकार श्री अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने रविवारी (दि. १६) खारघर येथे महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून शुक्रवारपासूनच श्री सदस्य पनवेलमध्ये दाखल होत आहेत. त्यामुळे शनिवारी पनवेल महापालिका क्षेत्रातील खासगी व शासकीय शाळांतील विद्यार्थ्यांना गर्दीचा किंवा वाहतूक कोंडीचा सामना करावा लागू नये यासाठी महापालिका क्षेत्रातील सर्वच शाळा बंद ठेवण्याचे आदेश महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके यांनी एका पत्रान्वे जाहीर केले आहे. त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्वच शाळांना सुटी जाहीर करण्यात आली आहे.

आपल्या निरूपणाच्या बैठकीच्या माध्यमातून समाज घडवणाऱ्या ज्येष्ठ निर्माण श्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर केला आहे.

या पुरस्काराचे वितरण सोहळा खारघर येथे भव्य दिव्य स्वरूपात रविवारी घेण्यात येणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून जवळपास वीस लाख श्री सदस्य कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. हे श्री सदस्य शुक्रवारपासूनच पनवेलमध्ये आपल्या वाहनासहित दाखल होत आहेत. त्यामुळे श्री सदस्यांच्या अलोट गर्दीमुळे शालेय विद्यार्थ्यांना कोणत्याही वाहतूक किंवा गर्दीचा सामना करण्यात येऊ नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून पनवेल महापालिका क्षेत्रातील सर्व शासकीय व खाजगी शाळांना महापालिकेने सुटी जाहीर केली आहे.

शनिवारी महापालिका क्षेत्रातील सर्वच आस्थापनेच्या शाळा या बंद ठेवण्याचे आदेश महापालिकेचे उपायुक्त विठ्ठल डाके यांनी एका पत्रांने काढले आहे. या दरम्यान, या परिसरातील शाळांतील काही वर्ग खोल्या व मैदान ही आरक्षित करण्यात आली आहेत. त्यामुळे संभाव्य गर्दीचा विद्यार्थी व पालकांना त्रास होऊ नये यासाठी शाळाच बंद ठेवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना सलग तीन दिवस सुटीचा आनंदही उपभोक्ता येणार आहे.

शुक्रवारी (दि. १४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सव, शनिवारी महापालिकेने शाळा बंद ठेवल्या आहेत तसेच नंतर रविवार असल्याने ही शाळा बंद असल्या कारणामुळे सलग तीन दिवस सुटीचा उपभोग येथील शिक्षक व विद्यार्थ्यांना मिळणार आहे.

# आजपासून खारघरमधील अंतर्गत रस्ते वाहतुकीत बदल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईतील खारघर येथे होणाऱ्या महाराष्ट्र भूषण कार्यक्रमानिमित्त शनिवार (दि. १५) २ वाजेपासून ते रविवार (दि. १६)च्या रात्री ११वाजेपर्यंत खारघरमधील ग्रामविकास भवन ते ओवेगाव चौक ते सिडको फुटबॉल मैदान चौक ते मेट्रो ब्रिज खालून बी. डी. सोमणी स्कूल चौक ते जयकुमार सर्कल ते गुरुद्वारा चौकपर्यंतचा रस्ता संपूर्णपणे वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे.

फक्त कार्यक्रमाच्या ठिकाणी पार्किंग ठिकाणावरून अनुयायी यांना घेवून येणारे वाहन-बस यासाठी हा रस्ता खुला राहणार असून इतर वाहने पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार असल्याचे वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी कळविले आहे.

शनिवार (दि. १५) २ वाजेपासून ते रविवार (दि. १६)च्या रात्री ११वाजेपर्यंत ग्रामविकास भवन ते ओवेगाव चौक ते सिडको फुटबॉल मैदान चौक ते मेट्रो ब्रिज खालून बी. डी. सोमानी स्कुल चौक ते जयकुमार सर्कल ते गुरुव्दारा चौक पर्यंतच्या रस्त्यावर नमुद कार्यक्रम संपेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना पूर्णवेळ प्रवेश बंदी असणार आहे.

### असा असेल पर्यायी मार्ग

ग्रामविकास भवन ने ग्रीन हेरीटेज चौक ते मुर्ती चौक, विनायक सेठ चौक मार्गे पापडीचा पाडा, तळोजा मार्गे इच्छित स्थळी जातील. आरएएफ तळोजा कडून पापडीचा पाडा मार्गे, विनायक सेठ चौजातील. ओवेगावातील स्थळी जातील.

### 'या' ठिकाणी वाहनांना बंदी

**नवी मुंबई :** खारघर येथे होणाऱ्या महाराष्ट्र भूषण कार्यक्रमानिमित्त शनिवार (दि. १५) २ वाजेपासून ते सोमवार (दि. १७)च्या सकाळी १० वाजेपर्यंत हिरानंदानी ब्रिज सिग्नलवरून युटर्न घेऊन कोपरा ब्रिज जवळील कटने डावीकडे वळून स्वर्णगंगा चौकातून पुढे सेक्टर ३५ कडील नियोजित वाहनतळाकडे जाणार आहे, असे प्रभारी पोलीस अधिकारी खारघर वाहतूक शाखा यांनी कळविले आहे. शनिवारपासून ते सोमवारच्या सकाळी १० वाजेपर्यंत मुंबई -पुणे मार्गावरील कोपरा अंडर पास वरून स्वर्णगंगा चौकाकडे जाणारा रस्ता नमुद कार्यक्रम संपेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना पूर्णवेळ प्रवेश बंदी असणार आहे.

**पर्यायी मार्ग :** पुणे- मुंबईकडुन स्वर्णगंगाकडे जाणारी वाहने कोपरा ब्रिज चढून हिरानंदानी ब्रिज खालील सिग्नल युटमेवुन परत कोपरा ब्रिजकडे जावुन कोपरा ब्रिज जवळील डावीकडील कटने स्वर्णगंगा चौकाकडे जावुन पुढे इच्छित स्थळी जातील. ही अधिसूचना कार्यक्रमाच्या ठिकाणी पार्किंग ठिकाणावरून अनुयायी यांना येवुन येणारी वाहने अथवा बस या करिता खुला राहील अशा वाहनांना लागू असणार नाही. तसेच अग्निशमन दल, पोलीस, रूग्णवाहिका व अत्यावश्यक सेवेतील सर्व वाहनांना लागू असणार नाही, असे श्री. काकडे यांनी कळविले आहे.

# रसाळ फळांना मागणी वाढली

## उन्हाची दाहकता व रमजान महिना विक्रेत्यांना पुरक

**पनवेल : वार्ताहर**

सध्या सुरू असलेल्या रमजान महिना तसेच उन्हाचा वाढत्या तडाखामुळे बाजारात रसाळ फळांना मागणी वाढली आहे. त्यामुळे घाऊक बाजारात कलिंगड, पपई आणि टरबूज फळे घेण्यासाठी नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

सध्या सुरू असलेल्या रमजान महिना तसेच उन्हाचा वाढत्या तडाखामुळे जागोजागी फळांचे रस, फळांचे सॅलड यांच्या गाड्या लागलेल्या दिसतात. त्यामुळे सध्या बाजारात या फळांना मागणी वाढली आहे, मात्र तरीही फळांच्या किमती स्थिर आहेत. रमजान महिन्यात रोजे सोडण्यासाठी बहुतांश लोक फळांचे सेवन करतात. त्यामुळे या रसदार फळांना मोठी मागणी आहे. म्हणूनच कलिंगड, पपई, खरबूज बाजारात मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. सध्या बाजारात कलिंगड ५० ते ७० रुपये प्रतिनग भाव आहे.

शहराच्या मुख्य भागासह गल्लीबोळातून फळ विक्रेते हातगाडीवर फळे विकताना दिसत असून ग्राहकांचा त्यांना प्रतिसाद मिळत आहे. उन्हाळ्याच्या तोंडावरच महागणारी रसदार फळे सर्वसामान्यांच्या खिशाला परवडतील, अशा दरात साध्या उपलब्ध आहेत. त्यामुळे नागरिक उन्हाळी फळांच्या खरेदीला प्राधान्य देत आहेत. विविध फळे खाण्यासह त्यांचा ज्यूस पिण्याकडेही नागरिकांचा कल वाढला आहे. त्यामुळे वर्षभर फळांचा रस आरोग्यास चांगला असून, तहानही भागवत असल्याने त्याला मोठी मागणी आहे.

वर्षभर शहरात फळांच्या रसांची दुकाने फारशी दिसत नसली तरी उन्हाळा सुरू होताच त्यांच्या संख्येत भर पडली जाते. या दुकानांमधूनही फळांना मोठी मागणी आहे. घरी फळे खाण्यासह ज्यूस सेंटरमध्ये विविध फळांचे रस पिण्याला नागरिक प्राधान्य देत आहेत.



# पैशाने तुटली नातीचा नाट्यप्रयोग सादर



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील अष्टगंधा कलामंचयाच्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त मंगळवारी (दि. ११) पैशाने तुटली नाती या दोन अंकी नाटकाच्या शुभारंभाचा पहिला प्रयोग बाबीबाई त्रिंबक पाटील हिच्या स्मरणार्थ रांजणपाडा येथील हनुमान मंदिराच्या भव्य पटांगणात सादर करण्यात आला.

नाटकाचे लेखन नाटककार हसूराम पाटील यांनी केले असून, या नाटकाचे दिग्दर्शन नाटककार धनेश्वर म्हात्रे यांनी केले आहे. साडेबारा टक्क्यांच्या आणि जमिनीच्या पैशाने भावा-बहिणीतल्या नात्यातला ओलावाच नष्ट होतो. अशा सद्य परिस्थितीतील नातेसंबंधाच्या वास्तवावर चर्चा करायला लावणारे नाटककार हसूराम पाटील यांच्या वास्तववादी लेखणीतून उतरलेले पैशाने तुटली नाती हे नाटक समाजातील वास्तवाशी ताडून त्यावर चर्चा करायला लावते.

नाटककार तथा प्रख्यात दिग्दर्शक धनेश्वर म्हात्रे यांनी या नाटकात आपले कसब वापरून, आकृतीबंध पद्धतीने हे नाटक बसविले आहे. एकंदरीत रेश्मा, सुधीर आणि मास्तर यांची नाटकातील शब्दांची जुगलबंदी ही रसिकांसाठी खास पर्वणी ठरली.

# प्लॅस्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई :** स्वच्छ सर्वेक्षण २०२३ च्या अनुषंगाने कोपरखैरणे विभाग कार्यक्षेत्रातील बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणा-या व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

एकूण दंडात्मक शुल्क २० हजार रुपये वसूल करण्यात आले. बंदी असलेल्या प्लॅस्टिकचा वापर करणारे चार व्यावसायिकांवर प्रत्येकी पाच हजार रुपये, असे दंड आकारण्यात आला.

पालिकेकडून नागरिकांना सातत्याने प्लॅस्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन केले जात आहे. कापडी पिशव्यांसाठी जनजागृती करण्यात येत आहे, मात्र तरीही दुकानदारांकडून बिनदिक्कत प्लॅस्टिक पिशव्या वापरणे सुरू आहे.

# ज्येष्ठ नागरिक संघात चैत्रांगण सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिक संघटना पनवेल शहर येथे चैत्रांगण सोहळा (चैत्रगौरी) मोठ्या उत्साहात संघांच्या साप्ताहिक सभेमध्ये बुधवारी (दि. १३) साजरा करण्यात आला. यानिमित्त महिला सभासदासाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.

संस्थेच्या नीलाताई पटवर्धन सभागृहात चैत्रगौरीची स्थापना करण्यात आली होती. या वेळी चैत्र गौरी विषयी वंदना दाते यानी महत्व विषद केले. संस्थेच्या स्त्री, पुरुष सभासदानी अभंगवाणी भक्तिगीते सादर केली गेली. यामध्ये भजनी बुवा कडू, प्रमोद काळे, वासुदेव नातू, दत्ता ढोले, मृणालिनी मोघे, माधवी कोल्हापुरे, विद्या नातू, वसुधा नेवाळे, पूजा सामंत, अंजली कानडे, शुंभागी कऱ्हाडकर, मोहिनी शिरोडकर, माधुरी गुर्जर, अलका देशमुख, उज्ज्वला कुलकर्णी आदींनी सहभाग घेतला होता. मोहन शिरोडकर आणि वासुदेव नातू यांनी तबला, ढोल, पेटी यावर उत्तम साथ दिली.



या सोहळ्याला संघांच्या कार्यकारणी सदस्य, सभासद बहुसंख्येने उपस्थित होते. ज्येष्ठ पत्रकार अनंत सिंगासने व दिलीप रेडकर यांनीही उपस्थिती दर्शविली. या वेळी अल्पोपहार म्हणून आंबेडाळ व कैरीचे पन्हे याचे वाटप करण्यात आले. या सोहळ्यास या वयातही महिला सभासदांचा उत्साह वाखणण्याजोगा होता.

# रायगडमध्ये गावागावात निळे झेंडे फडकले



## ■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे निमित्त
## ■ अनेक ठिकाणी संयुक्त जयंती कार्यक्रम

**पाली : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त जिल्ह्यात उत्साह संचारलेला दिसत आहे. याबरोबरच काही ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती कार्यक्रम राबविला जातो. त्यामुळे बहुजन समाजसह सर्वच समाजातील लोक हा संयुक्त जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करतात. यानिमित्ताने जिल्ह्यातील विविध दुकानांत विविध आकारांचे निळ्या रंगाचे झेंडे फडकत आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रायगडमध्ये विविध ठिकाणी निळे झेंडे आणि जयघोष केला जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांची छबी असलेले झेंडे व पंचशील झेंडे (पाच रंगांचे) विविध शहरातील दुकानांमध्ये विक्रीसाठी आले आहेत. शिवाय अनेकांनी आपली दुचाकी, रिक्षा व मोटारीला हे झेंडे लावले आहेत. संयुक्त जयंती कार्यक्रम व १४ एप्रिलला निघणाऱ्या मिरवणुकांमध्ये सुद्धा हे झेंडे फडकवले जात आहेत. त्यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात जणुकाही निळे वादळ आल्याप्रमाणे वाटत आहे.

वंचित बहुजन आघाडी रायगड जिल्हा युवक अध्यक्ष अमित गायकवाड यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे आयोजन जिल्ह्यातील अनेक ठिकाणी होते. यानिमित्ताने पुरोगामी विचारवंत व कार्यकर्ते यांची भाषणे आयोजित केली जात आहेत. त्याचबरोबर रॅलीचेही आयोजन करण्यात आले होते.



### बाबासाहेबांचा जयघोष

काही ठिकाणी पुस्तक प्रदर्शने भरवली जातात. या महापुरुषांच्या अतुल्य कार्याचा गौरव सर्व ठिकाणी केला जात आहे. प्रबोधन आणि जनजागृती देखील करण्यात येत आहे. यामुळे शहराच्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जयघोष आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

## रोह्यात रक्तदान शिबिराला उदंड प्रतिसाद



**रोहे : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या जिल्ह्यातील बौद्ध समाज युवा संघाच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन रोहा शासकीय विश्रामगृहात येथे करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पत्रकार महादेव सरसंबे, जेष्ठे नेते यशवंत शिंदे, खेड नगरपरिषद मुख्याधिकारी छायाताई आहीरे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी बौध्द समाज युवा संघ रायगड अध्यक्ष जितेंद्र गायकवाड, संस्थापक रमेश शिंदे, तालुकाध्यक्ष विशाल सुरलकर, सचिन नरेश गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश गायकवाड, दीपक दाभाडे, प्रा. सुविनय आहीरे, जिल्हा अध्यक्षा राजेश्री दाभाडे, राजेंद्र जाधव, अमोल वाटवे, कमलेश शिंदे, अनंत दाबणे, प्रमोद गायकवाड, रोहीत शिंदे, प्रताप खंडारे, प्रथमेश कांबळे, शरद कांबळे, संध्या जाधव, सुविधा अहीरे, श्वेता कांबळे, हर्षदा खंडारे, मंजुळा जाधव, वैशाली जाधव आदी उपस्थित होते.

# पेण नगरपरिषदेसह विविध संघटनांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३२ वी जयंती पेण नगरपरिषद व विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना यांच्या वतीने साजरी करण्यात आली.

यावेळी महात्मा गांधी मंदिर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सामुदायिक बुद्धवंदना करण्यात आली. तसेच यानिमित्त शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास देखील पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी





माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, उपनगराध्यक्षा वैशाली कडू, गटनेते अनिरुद्ध पाटील, माजी सभापती प्रकाश पाटील, जनार्धन जाधव, दिलीप लाड, प्रकाश रामाणे, हिमांशू कोठारी, नगरसेवक, नगरसेविका व बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पेण नगरपरिषदेच्या सभागृहातही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सांगितले कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या राज्य घटनेतुन गोरगरीब जनतेला समसमान न्याय हक्क मिळवून देण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्या कार्यातुन प्रेरणा घेऊन सर्वांनी काम करावे अशी आशा प्रितम पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी माजी नगरसेवक जनार्दन जाधव यांनी पेण नगरपरिषदेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल व या कामाचा पाठपुरावा केल्याबद्दल लोकप्रतिनिधींचे व मुख्याधिकाऱ्याचे आभार मानले. यावेळी गटनेते अनिरुद्ध पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येत्या १ वर्षात होऊन पुढील जयंती आंबेडकर भवनात साजरी कशी करता येईल या प्रशासनाने पाठपुरावा करावा अशी मागणी केली. यावेळी मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी उपस्थित लोकप्रतिनिधी व नागरिकांना बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

# प्लास्टिक व्यवस्थापनाचा सोपा आणि अनोखा मार्ग

### शाळा व घराघरांत जनजागृती

**सुधागड : प्रतिनिधी**

प्लास्टिक व्यवस्थापनाचा सोपा व अनोखा मार्ग सध्या सर्वत्र चर्चेत आहे. प्लास्टिकचे व्यवस्थापन आणि वापराबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्ह्यात शाळा व घरघरांत हा उपक्रम व जनजागृती करण्यात येत आहे.

सरकारने प्लास्टिक बंदी आणली, दंड ठोठावले मात्र तरीही प्लास्टिक वापर सुरूच आहे. शिवाय वेफर्स, चॉकलेट व इतर पदार्थांची वेस्टने यावर कोणतेच नियंत्रण नाही. परिणामी तेही डोकेदुखी ठरत आहेत. यावर उपाय म्हणून जिल्ह्यातील काही शाळेतील विद्यार्थी हे मुख्याध्यापक शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्लास्टिक पिशव्या, चॉकलेट, वेफर्स व इतर पदार्थांची वेस्टने जमवून ती प्लास्टिकच्या बाटलीत भरण्याचा पर्यावरणस्नेही उपक्रम राबवित आहेत. प्रोत्साहनपर बक्षीस मिळाल्याने या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा भरपूर प्रतिसाद मिळत आहे.

आदर्श प्राथमिक विद्यामंदिर, उतेखोल – माणगाव, पालीतील ग. बा. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालय, तसेच जांभुपाडा आत्मोन्नती विद्यालय येथे मागील तीन वर्षांपासून हा अनोखा पर्यावरणस्नेही उपक्रम राबविला जात आहे. जिल्ह्यातील इतरही शाळांमध्ये हा उपक्रम सुरू आहे.

या उपक्रमात प्लास्टिक पिशव्या, वेष्टनांनी भरलेली बाटली आणणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक बाटलीमागे काही चॉकलेट प्रोत्साहन पर दिले जात आहेत. या उपक्रमामुळे प्लास्टिक समस्या मार्गी लागली आहे. शाळा, घर व सभोवतालचा परिसर स्वच्छ राहण्यास मदत देखील होत आहे. मानवी जीवनात प्लास्टिकचा वापर अनिवार्य झाला आहे.

अलिबाग येथील महाराष्ट्र अंनिसचे नितीनकुमार राऊत यांनी सांगितले, पाण्याची बाटली सहज कोणालाही कुठे पण मिळून जाते. प्रत्येक घरामध्ये दररोज कमीत कमी एक किंवा जास्त प्लास्टिकच्या पिशव्या येतातच, (उदा. तेल पिशवी, दुध पिशवी, किराणा



पिशवी, शैंपू, साबण, मॅगी, कुरकुरेच्या पिशव्या व वेष्टन कचऱ्यामध्ये न टाकता, दररोज पाण्याच्या बाटलीमध्ये टाकल्या जातात. ही बाटली भरली की व्यवस्थित झाकण लावून कचऱ्यात टाकू शकता. जेणेकरून विस्कटलेले प्लास्टिक जनावर खाणार नाहीत. शिवाय पावसाळ्यात नदी नाले तुंबून पुरसदृश्य स्थिती निर्माण होणार नाही. यामुळे प्लास्टिक कचऱ्याची आणि पाण्याच्या बाटलीची व्यवस्थित विल्हेवाट लागते. कचरा विभागाला कचरा जमा करायला पण सोयीस्कर होते. बाटल्या प्लास्टिक जमा करणाऱ्या लोकांना दिल्या जाऊ शकतात त्यामुळे त्यांच्या हाती देखील दोन पैसे मिळतात. एवढ्या एका लहान कामातून पर्यावरण, पृथ्वी आणि येणाऱ्या पिढीला खुप मोठा फायदा होतो. हे काम प्रत्येकाने जमेल त्या वेळात, जमेल त्या पद्धतीने करता येते. शहरापासून ते गावातील प्रत्येक घरात हि चळवळ उभी राहत आहे. प्लास्टिक नियोजन युक्त भारत निर्माण होईल. याबाबत समाज माध्यमांवर जनजागृती होत आहे.

> **नुकताच शाळेमध्ये हा उपक्रम सुरू केला आहे. प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी व त्याचे योग्य नियोजन करण्यासाठी हा उपक्रम चांगला पर्याय आहे. शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना या उपक्रमासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. यामुळे घरोघरी देखील जनजागृती होत आहे.**
>
> **–अमोल जंगम, मुख्याध्यापक, आदर्श प्राथमिक विद्यामंदिर, उतेखोल – माणगाव**

## नागोठणे येथे श्री संत शिरोमणी गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा

**नागोठणे : प्रतिनिधी**

देवा तुझा मी कुंभार, नासी पापांचे डोंगर, ऐसा संतप्ते हो जाती, घडे साधूची संगती, पूर्ण कृपा भगवंताची, गोरा कुंभार मागे हेची भागवत धर्माचा पताका तेवत ठेवण्याचे महान कार्य संतानी केलेले आहे. निश्चयाचा महामेरु श्री संत गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा श्री क्षेत्र कुंभारआळी नागोठणे येथे साजरा होणार आहे.

सालाबादप्रमाणे श्री संत शिरोमणी गोरोबा काका पुण्यतिथी सोहळा श्री क्षेत्र कुंभारआळी येथे मंगळवार १८ एप्रिल रोजी आयोजित केला आहे. त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे. सकाळी काकड आरती, कळस स्थापना, दिंडी सोहळा, भजन दुपारी पुष्पवृष्टी हे सर्व धार्मिक कार्यक्रम ग्रामस्थ मान्यवरांच्या हस्ते होणार आहेत. श्री सत्यनारायणाची महापुजा, सायंकाळी संगीत भजन, नंतर वरप ग्रामस्थांचे हरिपाठ आणि भाविकांना महाप्रसाद दिला जाणार आहे.

## पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्थेची निवडणूक जाहीर

**खालापूर : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित वायाळ तालुका खालापूर जिल्हा रायगड या संस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी प्राथमिक मतदार यादी तयार करण्यासाठी बी. के. हंडे सेवानिवृत्त सहाय्यक निबंधक यांची नियुक्ती केलेली असून त्याप्रमाणे ते मतदार यादी तयार करण्याचे काम करीत आहेत. तथापि संस्थेचे सुमारे ६००० सभासद असल्याने व त्या संदर्भात संस्थेचे रेकॉर्ड परिपूर्ण नसल्याने प्राथमिक मतदार यादी तयार करण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

तरी या द्वारे संस्थेच्या सभासदांना कळविण्यात येते की संस्थेच्या सभासदांची मूलभूत माहिती अध्यायात तयार करण्यासाठी संस्थेचे गुगल फॉर्म तयार केला असून संबंधित संस्थेच्या सभासदांचे समाज माध्यमिक समूहावर ही माहिती भरून देण्यासाठी सर्व सभासदांना विनंती केली आहे. या अनुषंगाने पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना ही माहिती उपरोक्त लिंकवर भरण्याचे तसेच त्याची एक स्वाक्षरी असणारी संस्थेकडे सादर करण्याचे आवाहन याद्वारे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कालावधी यांनी केली आहे.

याबाबतची माहिती २१ एप्रिलपर्यंत लिंकवर भरून त्याची एक प्रत संस्थेकडे सादर करावी तसेच जे सभासद ही माहिती देणार नाहीत किंवा संस्थेकडे सादर करणार नाहीत याची नावे मतदार यादीमध्ये समाविष्ट करणे शक्य होणार नाही याची नोंद घेऊन घ्यावी. यासाठी संस्थेच्या सर्व सभासदांनी सहकार्य करावे असे आवाहन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था खालापूर यांनी केले आह.

## शंबा येथील शिवमंदिरात शिवलिंग प्राणप्रतिष्ठा सोहळा

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील गांधे आदिवासीवाडी परिसरातील निसर्गाच्या कुशीत वळवण नदीच्या काठी वसलेल्या पुरातन शिवमंदिरात कैलासवासी ललिता पांडुरंग गदमले यांच्या समरणार्थ पांडुरंग अंबाजी गदमले यांच्या कुटुंबियांच्या वतीने शिवलिंग, गणेश मूर्ती नंदी, पार्वती मातेच्या मूर्तिची प्राणप्रतिष्ठा सोहळा नुकताच असंख्य भाविक भक्तांच्या उपस्थितीत भक्तीमय वातावरणात झाला.

या पुरातन मंदिरात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या मूर्तिची प्राणप्रतिष्ठा करून मंत्रोच्चार व यज्ञ आहुतीचे पौराहित्य मुकुंद जोगळेकर, महेश केळकर, धवल परांजपे महाराज यांनी केले.

यज्ञात यशवंत गदमले, हर्षद गदमले, ऍड.हर्षदा गदमले, नरेश गदमले, परशुराम गदमले, ओमकार गदमले, समीर म्हात्रे,अनंत भुरे,विजय पाटील, अनंत गदमले, हिराचंद्र म्हात्रे, भूमिता पिंगळे, भारती मोकल इत्यादी जोडपी सहभागी झाली होती. जय घोलप ठाणे मुलुंड यांच्याकडून कार्यक्रमासाठी मोलाचे सहकार्य लाभले. या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट दिली. या वेळी भजन, किर्तन, हरिपाठ अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# साळाव ते आगरदांडा रस्त्याला मुहूर्त सापडेना

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुका पर्यटन क्षेत्र स्थळ असून सुद्धा साळाव ते आगरदांडा या रस्त्याला अद्याप मुहूर्त सापडत नसल्याने पावसाळ्यात मोठी बिकट समस्या उभी राहणार आहे. साळाव ते आगरदांडा हा किमान ४० किलोमीटरचा रस्ता असून सदरचा रस्त्याचे लवकरात लवकर मजबुतीकरण करण्यात यावे अशी मागणी सर्व नागरिकांकडून होत आहे.

पर्यटन स्थळ असल्याने येथे सर्वाधिक वाहनांची गर्दी व वर्दळ या रस्त्यावर आहे.मागच्या वर्षी सुद्धा फक्त खड्डे भरले गेले. परंतु रस्त्याच्या मजबुतीकरण मागील दोन वर्षांपासून न केल्याने सदरचा रस्ता खड्डेमय झाला आहे. काही रस्त्यांचे कार्पेट गेल्याने खाच खडे अधिक निर्माण झाले आहेत.मुरुड मुंबई या मुख्य रस्त्यावर नांदगाव हायस्कूल असून या शाळेला लागूनच सार्वजनिक बांधकाम खात्याने बांधलेली मोरी आहे. समुद्राचे पाणी वाहून जाण्यासाठी गोल पाईप लाईन टाकून हि मोरी बनवण्यात आली आहे. खूप वर्ष जुनी मोरी असल्याने या मोरीच्या भाग खाली वर झाला आहे. त्यामुळे या मोरीवरून गाडी गेल्यावर गाड्या उडतात व त्यातून अपघात होत आहेत.

मोरी सुद्धा लवकर तयार करणे खूप आवश्यक आहे.अन्यथा अपघाताची मालिका सुरूच राहणार आहे. हा रस्ता तातडीने बनवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खाते कोणतीही ठोस कार्यवाही घेत नसल्याने लोक मात्र तणावात आले आहेत. पावसाळा जवळ असून सुद्धा रस्ता मजबुतीकरणाबत कोणतीही प्रक्रिया पूर्ण होताना दिसत नाही.

सदरचा रस्ता हा पावसाळ्यानंतर बनणार असल्याचे मुरुड सार्वजनिक बांधकाम खात्याने स्पष्ठ केले आहे. त्यामुळे जो खराब रस्ता आहे त्याची मलमपट्टी करावी अशी मागणी सर्व नागरिकांकडून करण्यात येत आहे.



# पंजाबच्या होम ग्राऊंडवर गुजरात ठरले वरचढ

## सहा गडी राखून विजय



**पंजाब : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सचा सामना पंजाब किंग्जशी मोहालीतील पंजाब क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर गुरुवारी झाला. दोन्ही संघांना आपला शेवटचा सामना गमावला असून या सामन्यात त्यांना विजयी होणे गरजेचे होते. त्यात गुजरात टायटन्सने बाजी मारत यजमानांना त्यांच्याच घरात तब्बल सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला. हा सामना जिंकत गुजरातचा संघ गुणतालिकेत पहिल्या चार संघांमध्ये पोहचला आहे.

गुजरात टायटन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पंजाब किंग्जने प्रथम फलंदाजी करीत १५३ धावा केल्या. धावांचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात चांगली झाली. सलामीवीर वृद्धिमान साहा आणि शुबमन गिल यांच्यात ४८ धावांची दमदार भागीदारी झाली. साहाला १९ चेंडूत ३० धावा करताना रबाडाने बाद केला. त्याने त्याच्या खेळीत पाच चौकार मारले. त्यानंतर आलेला नवोदित साई सुदर्शन फारशी मोठी खेळी करता आली नाही. तो १९ धावा करून बाद झाला.

मागील सामन्यात बाहेर असलेला कर्णधार हार्दिक पांड्या केवळ आठ धावा करून नवख्या हरप्रीत ब्रारकडून बाद झाला, मात्र एका बाजूला शुबमन गिल जो पंजाबचा होम ग्राउंडवर लहानपणापासून खेळणारा फलंदाजाने पंजाब किंग्सला शानदार अर्धशतक झळकावत अस्मान दाखवले. त्याने ४९ चेंडूत ६७ धावा केल्या. त्याला सॅम करणने त्रिफळाचीत केले. डेव्हिड मिलरने १८ चेंडूत १७ धावा करीत सामना जिंकवून दिला. पंजाब किंग्सच्या गोलंदाजांना फारशी चमकदार कामगिरी करता आली नाही. तेवतियाने चौकार मारून सामना जिंकावला. अर्शदीप सिंग, कगिसो रबाडा, सॅम करण आणि हरप्रीत ब्रार यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना पंजाब किंग्जने २० षटकांत आठ गडी गमावून १५३ धावा केल्या होत्या. पंजाबच्या पाच फलंदाजांनी २० पेक्षा जास्त धावा केल्या, मात्र असे असतानाही संघ केवळ १५३पर्यंतच पोहचू शकला. पंजाबकडून मॅथ्यू शॉर्टने सर्वाधिक ३६ धावा केल्या. गुजरात टायटन्सकडून पदार्पण करणाऱ्या मोहित शर्माने दोन बळी घेतले, तर चार गोलंदाजांनी प्रत्येकी एक बळी घेतला. प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या पंजाब किंग्ज संघाची सुरुवात चांगली झाली नाही. पहिल्याच षटकात प्रभासिमरन पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर शिखर धवनही आठ धावा करून बाद झाला. मॅथ्यू शॉर्टने वेगवान खेळी खेळली, पण २४ चेंडूत ३६ धावा करून क्लीन बोल्ड झाला. भानुकाने अतिशय संथ खेळी खेळली. तो २६ चेंडूत २० धावा करून बाद झाला. जितेश २३ चेंडूत २५ धावा करून बाद झाला. सॅम करणने २२ चेंडूत २२ धावा केल्या. शाहरुख खान धावबाद होण्यापूर्वी नऊ चेंडूत २२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. हरप्रीतने आठ धावा केल्या.



















पनवेल : महापालिका आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून, लोकसहभागातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आमदार प्रशांत ठाकूर, सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप शहराध्यक्ष जयंत पगडे, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह इतर सहभागी झाले.



पनवेल : गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी सरपंच माई प्रकाश भोईर, उपसरपंच विजय हिरा घरत, माजी उपसरपंच व सदस्य सचिन रघुनाथ घरत, ग्रामपंचायत सदस्य अरुण कोळी, सदस्या उषा देशमुख आदी उपस्थित होते.



पनवेल : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गुळसुंदे येथील बुद्ध विहारात भीम अनुयायांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या वेळी बौद्धाचार्य हरिचंद्र सोनावळे, प्रकाश गायकवाड, चंद्रकांत केदारी, चंद्रकांत गायकवाड, दिलीप गायकवाड, उमेश गायकवाड, दिनेश गायकवाड, प्रकाश मोरे, अमोल गायकवाड आदी उपस्थित होते.






## बेणापूरच्या मैदानात सिकंदर शेखची बाजी

**खानापूर** : बेणापूर येथे हनुमान जन्मोत्सवानिमित्त भव्य कुस्ती स्पर्धा झाल्या. कुस्तीमध्ये सिकंदर शेख (कोल्हापूर) याने बनिया अमिन (पंजाब) याला चितपट करीत बाजी मारली.



या कुस्तीसाठी तीन लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. स्पर्धत एकूण १५ लाख रुपयांची बक्षिसे वाटण्यात आली. द्वितीय क्रमांकासाठीची मंजित खत्री (हरियाना) विरूद्ध साहिल पैलवान (इराण) यांच्यातील कुस्ती प्रदीर्घ वेळेनंतर बरोबरीत सोडविण्यात आली. या कुस्तीसाठी दोन लाख रुपयांचे बक्षीस ठेवले होते. मैदानात पंचाहत्तर हजार रुपये इनामाच्या पाचही कुस्त्या प्रेक्षणीय झाल्या. यात स्थानिक मल्ल अक्षय कदम (बेणापूर) याने छोटा गौरव (पंजाब) याला आकडी डावावर चितपट केले, तर सुबोध पाटील (सांगली) याने वैभव माने (पुणे) याला पोकळ घिस्सा डावावर पराभूत केले.

संदीप मोटे (सांगली) याने काही मिनिटांतच अक्षय मदने (पुणे) याला चितपट केले. किशोर पाटीलने (बेणापूर) सचिन ठोंबरे (सांगली) वर चटकदार विजय मिळवला. अनिल जाधव (कुर्डुवाडी) याने विकास पाटील (पुणे)वर प्रेक्षणीय विजय मिळविला.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com